# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

-----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०४ मार्च, २०२५ / फाल्गुन १३, १९४६ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |

-----------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ४८**

-----------------------------------------------

### मुंबई आणि उपनगरातील विदेशी मद्यविक्री दुकानांमध्ये एआय प्रणालीवर आधारित सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची सक्ती करण्याबाबत

**(१) * ६३५ अॅड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पवयीन मुलांकडून होणाऱ्या मद्य सेवनाला आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने मुंबई आणि उपनगरातील विदेशी मद्यविक्री दुकानांमध्ये एआय प्रणालीवर आधारित सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची सक्ती करण्याबाबत अधिसूचना जारी केलेली असतानाही राज्यातील एकाही वाईन शॉपमध्ये एआय कॅमेरे लावले गेले नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मदय विक्रेत्यांकडून शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन न केल्यामुळे सदर आदेश केवळ कागदोपत्री राहिले असून उक्त आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या विदेशी मद्य विक्रेत्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.

शासन आदेश दिनांक ११/१०/२०२४ अन्वये, प्रायोगिक तत्त्वावर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील ६० चौ.मी. क्षेत्रफळाच्या वरील हॉटेल्स/ रेस्टॉरंट आणि बार (अनुज्ञप्ती एफएल-३) व सर्व किरकोळ विदेशी मद्यविक्री शॉप (अनुज्ञप्ती एफएल-२) यामध्ये कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित सी.सी.टी.व्ही. प्रणाली स्थापित करण्याच्या सूचना निर्गमित केल्या होत्या. तथापि, या दोन्ही जिल्ह्यात हॉटेल्स / किरकोळ विदेशी मद्यविक्री आस्थापनांमध्ये पूर्वीपासून सी.सी.टी.व्ही. प्रणाली स्थापित केलेल्या आहेत व नवीन आदेशामुळे विविध श्रेणींमधील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि बार संघटनेच्या सदस्यांवर अवास्तव आणि

अत्याधिक आर्थिक भार पडणार असल्यामुळे वेगळ्याने विशिष्ट तांत्रिक मानकांची सी.सी.टी.व्ही. प्रणालीची गरज नसल्याने दिनांक ११/१०/२०२४ रोजीचे आदेश रद्द करण्याबाबत हॉटेल्स संघटनांनी शासनास निवेदन दिले होते. त्यामुळे उक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन दिनांक ०९/०१/२०२५ रोजी सदरचे आदेश रद्द केले आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळण्याबाबत

**(२) * ८० श्री.सचिन अहिर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गिरण्यांच्या जागेवर उभारलेल्या इमारतींमध्ये केवळ गिरणी कामगारांना घरे देणे अपेक्षित असताना शासनाने डीसीआर ५०८/२००१ नुसार गिरण्यांच्या जागेवर उभारल्या जाणाऱ्या घरांपैकी ३३ टक्के घरे संक्रमण शिबिरासाठी राखीव ठेवण्याची तरतूद केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील गिरणी कामगारांना व त्यांच्या वारसांना मुंबईत हक्काची घरे देण्याचा निर्णय होऊनही सुमारे सात हजार गिरणी कामगार घरापासून वंचित असून आतापर्यंत किती गिरणी कामगारांना घरे देण्यात आली व किती अर्ज प्रलंबित आहेत तसेच उर्वरित अर्ज भरण्यास प्रलंबित राहिलेल्या गिरणी कामगारांच्या वारसांना अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात येणार आहे काय व त्यांच्याकडून कधीपर्यंत अर्ज भरुन घेण्यात येणार आहेत तसेच त्याची सर्वसाधारण रुपरेषा काय आहे,
(३) असल्यास, सन १९८२ पासून मुंबई येथील बंद कापड गिरण्यांमधील सर्व कामगारांना व मयत कामगारांच्या वारसांना घरे देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार अद्यापी बहुतांश गिरणी कामगारांना घरे देणे बाकी आहे तसेच शासनाने दिनांक १५ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर गिरणी कामगारांना व वारसांना मुंबई बाहेर व ठाणे जिल्ह्यामध्ये घरे देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सद्य:स्थितीत मुंबईत जागा नसल्यामुळे शासनामार्फत मुंबई बाहेर घरे दिली जात आहेत, परंतु शासनाने सन २०१९ मध्ये सुमारे १८०० एकर जमीन विकासकांना बाजारभावाच्या १० टक्के दराने दिली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, गिरणी कामगारांना घरे मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम जाहीर करण्याबाबत गिरणी कामगार संघर्ष समितीने मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने गिरणी कामगारांना रास्त भावात घरे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(६) असल्यास, गिरणी कामगार व त्यांच्या वारसदारांना मुंबईत मोफत घरे देऊन पुनर्वसन करावे, तसेच मुंबई बाहेर गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत दिनांक १५ मार्च, २०२४ रोजी काढलेला शासन निर्णय मागे घेण्याच्या मागण्यांसाठी दिनांक १८ जानेवारी, २०२५ रोजी लालबाग येथील भारतमाता सिनेमागृहाजवळ गिरणी कामगारांनी आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, शासनाने कालबध्द कार्यक्रम जाहीर करुन त्यांची अंमलबजावणी करावी तसेच मुंबई बाहेर दिल्या जाणाऱ्या घरांच्या किंमती मुंबईच्या तुलनेत कमी ठेवाव्यात अशी मागणी गिरणी कामगार संघर्ष समितीमार्फत माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(८) असल्यास, गिरणी कामगारांच्या उक्त मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने तसेच गिरणी कामगारांना व वारसांना मुंबईतच घरे देण्याबाबत शासनाने कोणती निर्णयत्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सुधारीत बृहन्मुंबई विनियम विकास नियंत्रण नियमावली ५८ (१)(ब) नुसार मुंबईतील कापड गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटई क्षेत्र यांचे वाटप प्रत्येकी १/३ हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा व गिरणी मालक यांना देण्याची तरतूद आहे. तसेच, म्हाडाला प्राप्त होणाऱ्या प्राप्त सदनिकांपैकी २/३ सदनिका गिरणी कामगारांसाठी व १/३ सदनिका संक्रमण शिबिरासाठी ठेवण्याची तरतूद आहे.
(२) गिरणी कामगारांच्या घरांसाठी म्हाडास प्राप्त जमीनीवर म्हाडामार्फत बांधण्यात आलेली १३,४५३ व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (MMRDA) प्राप्त २४१७ अशा एकूण १५,८७० घरकुलांचे गिरणी कामगारांना वाटप करण्यात आले आहे.

म्हाडा व कामगार विभागाने घेतलेल्या विशेष मोहिमेंतर्गत आत्तापर्यंत १,१३,०१६ इतके अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी १,०१,६८४ गिरणी कामगार पात्र झाले असून, उर्वरित अर्ज प्रलंबित आहेत. या मोहिमेंतर्गत सन २०१०, सन २०११ व सन २०१७ मध्ये ज्या गिरणी कामगारांनी नोंदणी केली आहे, त्याच गिरणी कामगरांना विशेष मोहिमेंतर्गत गिरणी कामगार म्हणून पात्र करुन घेण्याची नोंदणी प्रक्रिया सुरू आहे.
(३) मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास (MMR) क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक १५/०३/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(४) अशी बाब कोणत्याही शासकीय यंत्रणांनी शासनाच्या निदर्शनास आणलेली नाही.
(५), (६) व (७) अशी मागणी दिनांक ३१/०१/२०२५ रोजी शासनाकडे झालेल्या बैठकीत काही संघटनांनी केली होती.

दिनांक १८/०१/२०२५ रोजी लालबाग येथील भारतमाता सिनेमागृहाजवळ गिरणी कामगारांनी आंदोलन केल्याबाबतचा कोणताही अभिलेख शासन अथवा म्हाडा प्राधिकरणाकडे दिसून येत नाही.
(८) दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार गिरणी कामगारांना घरे देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील हवेचे वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३) * ४२९ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, ॲड.अनिल परब, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.राजहंस सिंह,**

**श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) क्षेत्रात विशेषत: बृहन्मुंबई व ठाणे महानगरपालिकेंतर्गत मोठ्या प्रमाणात इमारतींची बांधकामे तसेच विकासकामे सुरु असल्यामुळे प्रदूषणाची गंभीर समस्या निर्माण होऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने मुंबईतील काही भागांमध्ये हवा गुणवत्ता निर्देशांकांची (AQI) पातळी खालावली असल्याचे जाहीर केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबईमध्ये बांधकामामुळे होणारे हवा प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी महानगरपालिकेने तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी न करणाऱ्या बोरीवली व भायखळा येथील ७८ प्रकल्पांसह ४४३ इमारत बांधकामे व विकासकामे थांबविण्याच्या नोटीशी बजाविण्यात आल्या असून महानगरपालिकेच्या सागरी किनारा प्रकल्पाच्या कामामध्ये देखील प्रदूषण नियंत्रणासाठीच्या नियमांचे पालन होत नसल्याने त्यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत (MPCB) नोटीस बजाविली असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने नोटीस बजाविलेल्या इमारत बांधकामापैकी अद्याप १७४ ठिकाणी प्रदूषण नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी करण्यात येत नसल्याचे तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता राखण्यासाठी महानगरपालिकेने विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करूनही २९७ व्यावसायिकांनी हवा प्रदूषण नियंत्रण नियमावलीचे पालन केले नसल्याचे दिनांक ०२ जानेवारी,२०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील हवेच्या ढासळत्या दर्जामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ०३ जानेवारी, २०२५ रोजी नियुक्त केलेल्या अभियंत्याच्या समितीने प्रदूषण करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांविरुध्द तसेच अन्य संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रदूषणविरोधी मोहीम आणि कारवाई आक्रमक पध्दतीने सुरु केली आहे मात्र हवेची गुणवत्ता मोजणारी महानगरपालिकेची एकमेव गुणवत्ता निर्देशांक मोबाईल व्हॅन नादुरुस्त असल्याने महानगरपालिकेकडे पुरेशी सक्षम यंत्रणाच नसल्याची बाब उघडकीस आली असून मुंबईच्या प्रत्येक प्रभागात हवेची गुणवत्ता नोंदविणारे एक संयंत्र बसविण्याची मागणी मुंबईकरांकडून व स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात विशेषत: बृहन्मुंबई व ठाणे महानगरपालिकेंतर्गतचे वाढते हवा प्रदूषण कमी करून नियंत्रित ठेवण्यासाठी अद्ययावत प्रदूषण प्रतिबंधक उपाययोजना करण्याकरीता सक्षम यंत्रणा राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच हवा प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी महानगरपालिकांनी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांची/नियमांची अंमलबजावणी न करणाऱ्या व्यावसायिक/उद्योजक तसेच विकासकांविरुध्द कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकाशित केलेल्या हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार माहे जानेवारी, २०२५ मध्ये केवळ २ दिवसांसाठी मुंबईतील काही भागातील वायु गुणवत्ता निर्देशांकाची पातळी खालावलेली होती.

(२) हे अंशतः खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.०३/२०२३ मधील मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून त्यांची राज्यात अंमलबजावणी सुरु आहे. त्यानुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या मार्गदर्शक तत्त्वाची अंमलबजावणी न करणाऱ्या बोरीवली व भायखळा येथील अनुक्रमे ७८ व ४१ इमारत बांधकामे व विकासकामे थांबविण्याच्या नोटीशी बजावण्यात आल्या होत्या.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत (MPCB) महानगरपालिकेच्या सागरी प्रकल्पाच्या कामास ०१ जानेवारी २०२५ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात माहे जानेवारी, २०२५ मध्ये ३२ ठिकाणी प्रदूषण नियंत्रण नियमावलीची अंमलबजावणी करण्यात येत नसल्याचे आढळून आले आहे.

ठाणे महानगरपालिकेने २९७ बांधकाम व्यावसायिकांना हवेची गुणवत्ता योग्य राखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी नोटीस दिली.

त्यातील १५१ बांधकाम व्यावसायिकांना दंडात्मक नोटीस दिली. तसेच ३९ व्यावसायिकांना कामे थांबविण्यात का येऊ नये याबाबत नोटीस देण्यात आली आहे.

(४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या अभियंत्यांच्या समितीने स्थळ पाहणी करुन अटींचे पालन करत नसलेल्या १६६ प्रकल्पांच्या बांधकामास स्थगिती दिली होती. त्यापैकी अटींची पुर्तता केलेल्या ३४ प्रकल्पांची स्थगिती उठविण्यात आली आहे. तसेच, अद्याप पर्यंत अटींची व शर्तींची पुर्तता न केलेल्या सुमारे १३२ प्रकल्पांच्या बांधकामास दिलेली स्थगिती कायम आहे.

(५) हवा गुणवत्तेची शहानिशा करण्यासाठी महानगरपालिकेकडे अतिरिक्त वायु गुणवत्ता मापन मोबाईल व्हॅन असून सदर व्हॅन ०१ डिसेंबर २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीसाठी तांत्रिक कारणास्तव नादुरुस्त होते.

हवेची गुणवत्ता नोंदविणारी संयंत्रे बसविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मागणी करण्यात आलेली आहे, हे खरे आहे.

(६) मुंबई शहरातील वाढते वायू प्रदूषण रोखण्याच्या अनुषंगाने मुंबई वायु प्रदूषण शमन आराखडा व २८ सर्वंकष मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी काटेकोरपणे सुरु आहे. मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी एकूण २८ स्थायी “स्वयंचलित वातावरणीय वायु संरक्षण केंद्रे (CAAQMS)” कार्यरत आहेत.

रस्ते पाण्याने धुणे, बांधकामाधीन इमारतीला चोहो बाजूनी हिरवे कापड/ज्यूट ताडपत्रीने पूर्ण झाकून बंदिस्त करणे, सातत्याने पाणी फवारणी/ मिस्टींग संयंत्रांचा वापर, इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून आजमितीस २२३७ बांधकाम प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून १२३५ बांधकाम प्रकल्पांची कामे बंद करण्यासाठी लेखी सूचना देण्यात

आलेल्या आहेत.

ठाणे महानगरपालिकेने वाढते हवा प्रदूषण नियंत्रित ठेवण्यासाठी अद्ययावत प्रदूषण प्रतिबंधक उपाययोजना करण्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणे सर्व बांधकाम व्यावसायिकांना तसेच METRO, MMRDA, MSRDC व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या कामांसाठी बंधनकारक केले आहे.

ठाणे महानगरपालिकेकडे सद्य:स्थितीत २ CAAQM मशीन, ३ हवा प्रदूषण मोजमाप करणारे स्टेशन (Manual) व २ मोबाईल व्हॅन उपलब्ध आहे. तसेच ५० बांधकाम व्यावसायिकांनी Low Cost Air Pollution Monitor Sensor लावले आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## जळगाव जिल्ह्यातील उड्डाण पूल रस्त्यांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४) * ९१४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) तालुक्यातील बोदवड-मलकापूर, पुरनाड फाटा ते डोलारखेडा-पिंप्रीअकाराऊत, चांगदेव मंदिर मानेगाव जुनी कोथळी ते गजानन महाराज मंदिर ते राज्य मार्ग (ता.मुक्ताईनगर, जिल्हा जळगाव) या रस्त्यांची दुरवस्था झाली असून सदर रस्त्यांच्या निकृष्ट दर्जामुळे वाहतूक करण्यास अनेक समस्या उद्भवत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोलारखेडा कुऱ्हा वडोदा रस्त्यावरील चारठाणा ते कुऱ्हा दरम्यान वाघझिरा नाल्यावरील (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) उड्डाण पूल रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असून सदर बांधकामाची चौकशी करून संबंधित अधिकारी व ठेकेदार यांचेवर कारवाई करणेसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील बोदवड रेल्वे स्टेशन जवळ नाडगाव उड्डाण पूल रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले असून सदर बांधकामाची चौकशी करून संबंधित अधिकारी व ठेकेदार यांचेवर कार्यवाही करणे संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई व मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,नाशिक यांचेकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर उडडाण पूल रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या तसेच ६ वर्षे काम अपूर्ण ठेवणाऱ्या दोषी ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच सदर उड्डाण पुलाच्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

(२) होय, निवेदन प्राप्त आहे.

(३) होय, निवेदन प्राप्त आहे.

(४) बोदवड-मलकापूर रस्त्यावर MSIDC मार्फत सुधारित HAM योजनेंतर्गत मंजूर कामाचे कार्यारंभ आदेश दिले असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत प्रगतीत असलेले काम थांबवून उर्वरित काम रद्द करण्यात आले आहे.

पुरणाड फाटा ते डोलारखेडा-पिंप्रीअकाराऊत प्ररामा-०५ या रस्त्यावर मंजूर डांबरीकरणाचे कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन लवकरच काम कार्यान्वित करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत सदर रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

चांगदेव मंदिर मानेगाव जुनी कोथळी माताईनगर प्रजिमा- ९१ मधील ७०० मी. लांबीचे मजबूतीकरणाचे काम सद्य:स्थितीत प्रगतीत आहे.

तसेच सदर रस्त्यावरील १४.५०० कि.मी. लांबीतील मजबूतीकरणाचे काम प्रगतीत आहे, तथापि, कंत्राटदाराने करारनाम्याच्या तरतूदीप्रमाणे प्रगती न राखल्याने दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

डोलारखेडा कुऱ्हा वडोदा रामा-४७ धामणगाव फाटयाजवळ वाघझिरा नाल्यावरील पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून पोच रस्त्याचे काम प्रगतीत आहे. सदरचे काम करारनाम्याच्या तरतूदीप्रमाणे कार्यान्वित करण्यात येत आहे

मुक्ताईनगर बऱ्हाणपुर प्ररामा-०५ वरील नाडगाव बोदवड रेल्वे स्टेशनजवळील उड्डाणपूलाचे व पोच मार्गाचे काम प्रगतीत आहे. प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे अहवालातील नमूद मुद्यांनुसार कार्यवाही करुन काम हाती घेण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभाग बंद असल्याबाबत

**(५) * ५९२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयातील हृदय शस्त्रक्रिया विभाग अनेक दिवसापासून बंद ठेवण्यात आल्याने सर्वसामान्य रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायर रुग्णालयातील बाह्य रुग्ण विभागांमध्ये दररोज तीन ते साडेतीन हजार रुग्ण उपचारासाठी येत असतानाही हृदय शस्त्रक्रिया व इतर अनेक उपकरणे बंद ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, नायर रुग्णालयामध्ये सर्व उपकरणे व यंत्रणा सुस्थितीत व अद्ययावत ठेवण्यासाठी तसेच शस्त्रकिया विभाग पुर्ववत सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नायर रुग्णालयातील ह्दय शस्त्रक्रिया विभाग सुरु आहे. परंतु, दिनांक ५ डिसेंबर, २०२४ ते दिनांक ४ जानेवारी, २०२५ या कालावधीत ओपन हार्ट सर्जरी करीता आवश्यक ऑक्सीजनेटरचा पुरवठा नसल्याने केवळ या शस्त्रक्रिया करण्यात येत नव्हत्या. अशा रुग्णांना महानगरपालिकेच्या सायन व के.ई.एम. रुग्णालयात पाठविण्यात येत होते.

(२) हे खरे नाही.

(३) नायर रुग्णालयातील सर्व उपकरणे सुस्थितीत आहेत. सद्य:स्थितीत ओपन हार्ट सर्जरी सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारदरा (ता.अकोले, जि.अहिल्यानगर) येथील आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरे जलाशयाच्या शतकपुर्तीनिमित्त जल संग्रहालय उभारण्याबाबत

**(६) * ३३ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारदरा (ता.अकोले, जि.अहिल्यानगर) येथील आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरे जलाशयाच्या शतकपूर्तीनिमित्त जल संग्रहालय (वॉटर म्युझियम) उभारण्यासह पर्यटन आराखडा राबविण्याबाबत जलसंपदा व पर्यटन विभागात सामंजस्य करार करण्याचा निर्णय दिनांक १२ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंग्रहालय उभारणी झाल्यास याठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना जलाशयाविषयी माहिती मिळू शकेल तसेच पर्यटनवाढीला चालना मिळू शकेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जागतिक पर्यटन वाढीच्या दृष्टीने बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर कराराची तात्काळ अंमलबजावणी करून कार्यवाही करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी शासनाकडे मागणी करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील जलाशयास १०० वर्षे पूर्ण होत असून उक्त कराराची अंमलबजावणी करून या संग्रहालयासाठी जागेचीही उपलब्धता करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सन-२०२४ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनामध्ये दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजी लोकप्रतिनिधी यांनी याबाबत विशेष उल्लेख सूचना उपस्थित केलेली आहे.

(४) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व गोदावरी मराठवाडा विकास महामंडळ यांचे दरम्यान करावयाच्या सामंजस्य करारनाम्याच्या मसुद्याची छाननी क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(७) * ७८१ श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व गोवा राज्याला जोडणाऱ्या व कोकण विकासाच्या दृष्टीने महत्वाचा असणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गत अनेक वर्षांपासून अपूर्णावस्थेत असून सदर महामार्गाच्या कॉंक्रीटीकरणाचे काम दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे आश्वासन तत्कालिन सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल ते महाड दरम्यान महामार्गाचे काम अपूर्णावस्थेत असून ठिकठिकाणी बायपास, उडडाणपुल तसेच मोऱ्यांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई – गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या पहिल्या टप्प्यातील पळस्पे ते इंदापूर या भागात कंत्राटदाराने दिशादर्शक फलकच लावले नसल्यामुळे वाहन चालकांची प्रवास करताना दिशाभूल होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या असून अपघातांच्या प्रमाणातही वाढ झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत पंधरा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण करुन सदर महामार्ग सक्षमपणे वाहतूकीसाठी खूला करण्यासाठी तसेच तात्काळ ठळकपणे दिशादर्शक फलक लावण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील कि.मी.०/०० ते ८४/६०० या लांबीतील काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत प्रगतीत असून, त्यापुढील कि.मी. ८४/६०० ते ४५०/१७० या लांबीतील काम राष्ट्रीय महामार्ग (सार्वजनिक बांधकाम) विभागामार्फत प्रगतीत आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत प्रगतीत असलेल्या एकूण ८४.६० कि.मी. लांबीपैकी ७४.८० कि.मी. कॉक्रिटीकरणाचे काम पूर्ण झालेले असून उर्वरित पनवेल ते कासू ४२.३० कि.मी. लांबीतील मोठे पूल /उड्डाणपूलाचे काम मार्च-२०२५ पर्यंत व कासू ते इंदापूर ४२.३० कि.मी. लांबीतील मोठे पूल /उड्डाणपूलाचे काम डिसेंबर-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभाग (सार्वजनिक बांधकाम) यांचे मार्फत प्रगतीत असलेल्या एकूण ३५५.२८ कि.मी. लांबीपैकी ३१९.९० कि.मी. लांबीतील काम पूर्ण झालेले असून उर्वरित ३५.३५ कि.मी. लांबीतील काम प्रगतीत आहे. सदर लांबीतील मोठे पूल /उड्डाणपूल वगळता उर्वरित काम मे-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय महामार्ग (सार्वजनिक बांधकाम) यांचे मार्फत प्रगतीत असलेल्या इंदापूर व महाड या लांबीपैकी, इंदापूर व माणगांव बायपासच्या लांबीमधील मोऱ्याचे व पूलाचे काम प्रलंबित आहेत. तसेच लोणेरे ते लाखपाले या भागातील पूलाचे काम प्रगतीत आहे.

(३) अंशत: खरे आहे.

पळस्पे ते इंदापूर या लांबीमध्ये काही ठिकाणी दिशादर्शक फलक बसविण्यात आले असून अन्य ठिकाणी दिशादर्शक फलक बसविण्याचे काम प्रगतीत आहे.

(४) मुंबई-गोवा महामार्गाच्या कि.मी. ०/०० ते ८४/६०० या लांबीतील भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडून प्रगतीत असलेल्या कामांपैकी गडब येथील उर्वरित भुयारी मार्ग (VUP) चे काम माहे मार्च-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन असून, कासू ते इंदापूर या लांबीपैकी ३३.३० कि.मी. लांबीतील कॉंक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले असून, उर्वरित भुयारी मार्गाची (VUP/PUP) कामे डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभाग (सा.बां.) प्रगतीत असलेल्या लांबी पैकी उर्वरित ३५.३५ कि.मी. लांबीतील मोठे पूल /उड्डाणपूल वगळता अन्य कामे मे-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन असून पुलासह जानेवारी-२०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या विभागांतील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) * १ अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये विविध संवर्गातील ७,१९,००० पदे मंजूर असून त्यापैकी ४,४४,००० पदांवर अधिकारी / कर्मचारी कार्यरत असून उर्वरित २७५००० पदे रिक्त आहेत तसेच प्रतिवर्षी ३ ते ५ टक्के पदे ही सेवानिवृत्तीमुळे रिक्त होतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण मंजूर पदांच्या ३५ टक्के म्हणजेच सुमारे अडीच लाखांहून अधिक पदे रिक्त असून सदर पदे भरताना कंत्राटी पध्दतीने भरण्याऐवजी वैधानिक मार्गाने भरण्याबाबत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत सात वर्षांपासून कर्मचारी भरती न झाल्याने प्रशासकीय कामकाजावर ताण येत असून नोकर भरती बंद असल्याने सुशिक्षित बेरोजगार शासकीय नोकरीपासून वंचित राहत असल्यामुळे वाढते औद्योगिकीकरण, नागरीकरण तसेच लोकाभिमुख प्रशासनाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी मर्यादा येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील रिक्त असलेली २७५००० पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, असे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(३) व (४) मागील सात वर्षापासून कर्मचारी भरती झालेली नाही, हे खरे नाही. गेल्या सात वर्षात शासनातर्फे वेळोवेळी रिक्त पदे भरण्यात आली आहेत.

विशेष म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात ७५००० रिक्त पदे भरण्याबाबत घोषणा करण्यात आली होती. त्याअनुषंगाने ऑगस्ट २०२२ ते ऑक्टोबर २०२४ पर्यंत सुमारे १,५३,००० इतक्या रिक्त पदांसाठी पदभरतीची विशेष मोहिम सुरु करण्यात आली. त्यापैकी ८५,३६३ उमेदवारांना प्रत्यक्षात नियुक्ती देण्यात आली आहे. यापैकी शासकीय पदांवर ४२,४८४ व निमशासकीय/ महामंडळातील पदांवर ३९,२१५ तर अनुकंपा तत्वावर ३,६६४ नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित रिक्त पदांवर भरतीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

सद्य:स्थितीत रिक्त पदे भरण्याबाबत वित्त विभागाचे थेट निर्बंध नाहीत.

शासनातील विहित पदांवर पदभरती ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असून नवीन पदनिर्मितीमुळे अथवा सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पदांवर संबंधित प्रशासकीय विभागाकडून वित्त विभागाच्या धोरणानुसार पदभरती करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अपात्र झोपडपट्टीधारकांना वितरीत केलेल्या सदनिका प्राधिकरणाने ताब्यात घेतल्या नसल्याबाबत

**(९) * ७१ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत घर मिळालेल्या झोपडीवासीयांची नावे पुन्हा नव्याने पात्र करुन घेण्याचे प्रकार निदर्शनास येत असताना, अंधेरीतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्रता रद्द झालेल्या २१ सदनिका धारकांना वितरीत करण्यात आलेल्या सदनिका एक वर्षाचा कालावधी होऊनही प्राधिकरणाने अद्याप ताब्यात घेतल्या नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस झोपडपट्टीधारकांना वितरीत करण्यात आलेल्या सदनिकांचा ताबा घेण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी २१ सदनिकाधारक/ गाळाधारकांपैकी १२ सदनिकाधारक अपात्र ठरल्याने आणि ९ सदनिकाधारक/गाळाधारक यांचे वाटपाबाबत कोणतेही सक्षम पुरावे नसल्याने दिनांक १०/०२/२०२५ कलम ३३ अंतर्गत आदेश पारित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पाणी वितरण करण्यासाठी पाणी मोजणी यंत्रे (जलमापक यंत्रे) बसविण्याची सक्ती केल्याबाबत

**(१०) * ३६८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या आदेशानुसार जलसंपदा विभागाने दिनांक ३० जून, २०२५ रोजीपर्यंत सर्व शेतकऱ्यांच्या शेतात घनमापन पध्दतीने पाणी वितरण करण्यासाठी पाणी मोजणी यंत्रे (जलमापक यंत्र) बसविण्याचा संकल्प केला असून या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना स्थानिक अधिकाऱ्यांना दिल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यास महापूराचा धोका असल्याने नदीकाठी शेतकऱ्यांच्या विद्युत मोटर टिकत नाहीत, पुराच्या पाण्यात मोटर, महावितरणचे खांब, डीपी बॉक्स वाहून जात असल्याने शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने त्यांच्यामध्ये असंतोषाची भावना निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा असूनही शेतकऱ्यांच्या पाणी वापरावर येणाऱ्या मर्यादा, मीटरनुसार जादा पाणीपट्टीचा भुर्दंड पडत असल्यामुळे मीटर सक्तीविरोधात इरिगेशन फेडरेशनने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने पाणी मोजणी यंत्राची (जलमापक यंत्र) सक्ती रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दिनांक २९ मार्च २०२२ रोजी निर्गमित केलेल्या ठोक जलप्रशुल्क आदेशातील परिशिष्ट १ मधील इतर अनुषांगिक तरतुदीमधील परिच्छेद ५ मध्ये नमूद केल्यानुसार खाजगी उपसा सिंचन योजनेच्या लाभार्थ्यांना घनमापन पध्दतीने ठोक जलप्रशुल्क आकारण्यासाठी जलमापक यंत्र बसविणे अनिवार्य केले आहे. तथापि, संक्रमण कालावधीत क्षेत्राधारित दर आकारण्याची तरतुद केली आहे. हा संक्रमण कालावधी एक वर्षापुरता मर्यादित आहे.तद्नंतर, प्राधिकरणाचे आदेश क्र.०१/२०२४ दिनांक २ फेब्रुवारी २०२४ अन्वये दिनांक २९ मार्च २०२२ रोजीच्या आदेशातील परिशिष्ट १ इतर अनुषंगिक परिच्छेद ५ च्या आदेशामध्ये जी सवलत केवळ एक वर्षासाठी अनुज्ञेय केली होती, ती आता दिनांक ३० जून २०२५ पर्यंत लागू राहील, असे आदेशित केलेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) खाजगी उपसा सिंचन योजना पाणीपट्टी आकारणी व वसुली अंमलबजावणीच्या विविध अडचणी दूर करण्यासाठी खाजगी उपसा सिंचन योजनांकरीता क्षेत्राधारित दर देण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे. तोपर्यंत दिनांक २६/०६/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये खाजगी उपसा सिंचन योजनांकरीता प्रवाही सिंचनासाठी क्षेत्र आधारित अनुज्ञेय दरानुसार आकारण्यास सद्य:स्थितीत स्थगिती देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गावरील आरवाली (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(११) * ३२० श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरवाली (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील मुंबई-गोवा महामार्गावर असलेल्या उड्डाणपुलावर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असून हे खड्डे डांबराने बुजविण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वीही रत्नागिरी जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्गावरील बहादूर शेख नाका येथील गर्डर तुटलेला पूल लाँचरच्या यंत्रणेसह कोसळला असून, सुरू असलेल्या उड्डाणपुलाचा गर्डर खचल्याच्या प्रकरणाच्या चौकशीसाठी पुलांच्या कामातील तज्ज्ञ त्रिसदस्यीय समितीस ही दुर्घटना कशामुळे झाली याची तपासणी करण्याचे आदेश तत्कालीन मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उड्डाणपुलाचे निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे आरवाली (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील मुंबई-गोवा महामार्गावर कि.मी. ७८/२१५ येथील उड्डाणपूल (VUP) चे काम पूर्ण झाले असून, सेवा रस्ता व साईड ड्रेनचे काम प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत मुंबई-गोवा महामार्गाच्या डाव्या मार्गीकेवरुन दोन्ही बाजूची वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.
(२) हे खरे आहे.

दिनांक १६/१०/२०२३ रोजी चिपळूण शहरातील मुंबई-गोवा महामार्गावरील बहादूर शेख नाका येथे सुरु असलेल्या उड्डाणपुलाचा गर्डर लॉचिंग करताना स्पाईन प्रीकास्ट कॉक्रिटचा भाग कोसळला. तद्नंतर त्याअनुषंगाने दिनांक १८/१०/२०२३ च्या आदेशान्वये (मुख्य अभियंता, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र आणि गोवा, नवी-मुंबई) तज्ञ समिती गठीत करण्यात आली होती.
(३) महामार्गाच्या नियुक्त कंत्राटदार मे.परशुराम आरवली हायवेज प्रा.लि. यांचेमार्फत कंस्ट्रक्शन एजन्सी (मे. एन सी इंन्फ्रा प्रा.लि.) बदलून कन्स्ट्रक्शन एजन्सी (मे. विजय मिस्त्री कंस्ट्रक्शन प्रा.लि.) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. नियुक्त कंत्राटदार नवीन संरचनेनुसार उड्डाणपुलाचे संपूर्ण काम स्वखर्चाने करत

आहे. तसेच उड्डाणपुलासाठी जुन्या डिझाईनप्रमाणे कास्ट केलेले स्पाईन सेगमेंट आणि विंग्स हे स्वखर्चाने तोडण्यात आले आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या दिनांक ८/०१/२०२१ च्या कार्यपध्दतीनुसार संबंधित कंत्राटदारास (Concessionaire) रुपये ५० लक्ष व सबंधीत स्वतंत्र अभियंत्यास (IE) रुपये २० लक्ष अशी दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती ते परतवाडा या मार्गावरील रस्त्यांवरील खड्डयांच्या दुरूस्तीसह रूंदीकरण करण्याबाबत

**(१२) * ८२४ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती ते परतवाडा ह्या महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे असून अपघातांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे रुंदीकरण अद्याप प्रलंबित असल्यामुळे तसेच या रस्त्यावरून मेळघाट तसेच मध्यप्रदेशला जाणाऱ्या ट्रकची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने याठिकाणी वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मार्गावरील खड्डयांची दुरूस्ती करून सदरहू मार्गाच्या रूंदीकरणाचे कामास निधी उपलब्ध करून सदर मार्गाचे डांबरीकरण व रुंदीकरणाच्या कामास तातडीने सुरूवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) अपघातांच्या संख्येत वाढ झाल्याची नोंद नाही.

(२) वाहतूक कोंडी होत नाही.

(३) सदर ५२ कि. मी. लांबीपैकी २३ कि. मी. लांबी सुस्थितीत आहे. ९.४ कि. मी. लांबीत मजबूतीकरणाचे काम प्रगतीत आहे. उर्वरित लांबीत वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत वेळोवेळी खड्डे भरुन रस्ता वाहतुकीकरीता सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिकेच्या रुग्णालयांसह आरोग्य केंद्रांमध्ये औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(१३) * ४२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहर महानगरपालिकेमार्फत श्रीमती किसनाबाई भरतीया व श्रीमती कस्तुरबा गांधी रुग्णालयांसह शहराच्या विविध भागातील सुरु असलेल्या आरोग्य केंद्रांमध्ये औषधांचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे रुग्णांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयांमध्ये तसेच आरोग्य केंद्रांमध्ये औषधांचा साठा उपलब्ध नसल्याने रुग्णांना बाहेरुन औषधे विकत घ्यावी लागत असून कागदी पाऊचमध्ये काही रुग्णांना औषधे दिली जातात तसेच महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी औषधांच्या मागणीकडे दुर्लक्ष करित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गरीब रुग्णांना शासकीय रुग्णालयात औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच औषधांच्या मागणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

अकोला महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातर्फे नॅशनल अर्बन हेल्थ मिशन (एनयुएचएम) अंतर्गत प्राप्त निधीद्वारे औषधांची खरेदी प्रकीया सुरू असताना १५ वित्त आयोगाअंतर्गत मे २०२४ ते डिसेंबर २०२४ दरम्यान ७ नवीन आरोग्य केंद्रांची भर पडली. त्यामुळे श्रीमती किसनबाई भरतीया व श्रीमती कस्तुरबा गांधी रुग्णालयासह काही आरोग्य केंद्रांमध्ये दिनांक ८ जानेवारी, २०२५ पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात काही औषधांचा तुटवडा होता.

त्यावेळी अकोला जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय यांच्याकडे औषधांची मागणी करून त्यांच्यामार्फत औषधसाठा पुरविण्यात आला. सद्य:स्थितीत औषध खरेदी प्रक्रीया पूर्ण झाली असून औषधांचा तुटवडा नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत बेस्टच्या विद्युत पुरवठा करणाऱ्या वीजवाहीन्यांची क्षमता वाढविण्याबाबत

**(१४)** * **१०४ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत वीज आणणाऱ्या ४०० के.व्ही.च्या दोन वाहिन्या ठप्प झाल्याने अन्य वाहिन्यांवर दबाव आल्याने निम्म्याहून अधिक मुंबईतील वीजप्रवाह दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी खंडित झाल्या प्रकरणी 'महाराष्ट्र वीज नियामक आयोगा'ने गंभीर दखल घेऊन वीज कंपन्यांना सूचना देऊनही आजमितिपर्यंत बेस्टला वीज जाळे सक्षम करण्यात आलेले अपयश तसेच बेस्ट प्रशासनाने स्थापन केलेल्या 'ग्राहक तक्रार निवारण प्रणाली'च्या अत्यंत अकार्यक्षम पध्दतीमुळे वीज ग्राहकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या बेस्टच्या वीजवाहिन्या दिवसेंदिवस वाढत असलेला विजेचा भार वहन करण्यास अकार्यक्षम ठरत असल्याने मुंबईकरांना करण्यात येत असलेला वीजपुरवठा सातत्याने खंडित होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज खंडित झाल्यावर तक्रार करण्यासाठी ग्राहकांना उक्त प्रणाली अंतर्गत देण्यात आलेल्या दूरध्वनी अथवा भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास बंद असणे किंवा ग्राहकांनी संपर्क साधल्यास त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसणे ही बाब स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज पुरवठासंबंधी ग्राहकांच्या तक्रार निवारणार्थ स्थापन केलेली बेस्ट उपक्रमाची 'ग्राहक तक्रार निवारण प्रणाली' अधिकाधिक लोकाभिमुख, सजग आणि कार्यक्षम करण्याबाबत तसेच वीजवाहिन्यांची क्षमता वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी बेस्ट उपक्रमाच्या वीज पुरवठा हद्दीत ४०० के. व्ही. वाहिनी ठप्प झाल्यामुळे, वीज पुरवठा खंडीत होण्याची घटना घडलेली नाही.

दिनांक ९ जानेवारी, २०२५ ला एका अतिउच्च दाबाचा तारखंडात तांत्रिक बिघाड उत्पन्न झाला होता. सदर बिघाडामुळे शितलादेवी परिसरातील सुमारे १२५२९ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत झाला असल्याने नियंत्रण कक्षाकडे ग्राहकांच्या तक्रारींचा ओघ लागला व नियंत्रण कक्षातील दूरध्वनी व्यस्त होते. त्यामुळे काही ग्राहकांच्या तक्रारी घेता आल्या नाहीत.
(२) जास्त वीज वाहनामुळे तसेच रस्ते खोदकामाच्या दरम्यान बेस्टच्या जुन्या वीज वाहिन्यांमध्ये दोष निर्माण होतात. अशा प्रसंगी तत्परतेने सदर दोषांची दुरुस्ती करुन वीज पुरवठा पूर्ववत केला जातो.
(३) हे खरे आहे.

नियंत्रण कक्षातील दूरध्वनी व्यस्त असतात, ही बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी बेस्ट उपक्रमाच्या निदर्शनास आणली आहे. काही वेळी अतिवृष्टीमुळे वा वातावरणातील उष्म्यामुळे तारखंडातील बिघाडांमध्ये वाढ होते. अशा वेळी वीज पुरवठा खंडीत झाल्यास, नियंत्रण कक्षाकडे ग्राहकांच्या तक्रारींचा ओघ वाढतो. म्हणून ग्राहकांना प्रतिसाद देण्यास विलंब होतो.
(४) सध्या कार्यान्वित असलेले फ्यूज कंट्रोल अधिक सक्षम करण्याकरीता 'तक्रार निवारण केंद्र' (Call Center) केंद्र शासनाच्या सुधारित वितरण क्षेत्र (आरडीएसएस) योजनेंतर्गत स्थापित करण्यात येत आहेत. तसेच, वीजवाहिन्यांची कार्यक्षमता वाढविण्याबाबत आरडीएसएस अंतर्गत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे (मुंबई) येथील स्वामी विवेकानंद सरोवराची दुरवस्था झाल्याबाबत

**(१५)** * **२६५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील "स्वामी विवेकानंद सरोवर" हे उपनगराचे सौंदर्यस्थळ असून या तलावात कचरा, बुरशी आणि वनस्पती साचली असून या तलावाची महानगरपालिकेने साफसफाई केली नसल्यामुळे आजूबाजूच्या परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरलेली असून रोगराई होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलाव हा साडेतीन एकरांत पसरलेला असून या तलावाला दुसऱ्या श्रेणीचा हेरिटेज वारसा असताना तलावाची सद्य:स्थितीमध्ये अत्यंत दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वांद्रे (मुंबई) येथील "स्वामी विवेकानंद सरोवर" या तलावाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

वांद्रे (पश्चिम) मुंबई येथील स्वामी विवेकानंद सरोवरामध्ये वनस्पती (Algee) साचल्यामुळे तलावातील पाण्याचा वास येत असून यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) स्वामी विवेकानंद सरोवर हा अंदाजे साडेसात एकरात पसरलेला तलाव असून या तलावास श्रेणी-२ हा हेरिटेज वारसा आहे. सदर तलावाची सद्य:स्थितीमध्ये दुरवस्था झालेली नाही.

(३) स्वामी विवेकानंद सरोवर तलावातील पाण्याचा दर्जा सुधारणे व सुंदर पर्यटन स्थळ पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीने तांत्रिक सल्लागारांची नेमणूक करुन सल्लागारांमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या पर्यावरण तज्ञ समितीमार्फत पाहणी करण्यात आली आहे. पर्यावरण तज्ञांनी सुचविल्यानुसार तलावाच्या पाण्याचे शुद्धिकरण जसे गाळ काढणे आणि पाणी उपसणे व तत्सम कामे तसेच, सुशोभिकरणाच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याचे काम मुंबई महानगरपालिकेतर्फे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील जलसंपदा विभागाच्या कार्यालयात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) * ५४७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील सन १९६० पासून जलसंपदा विभागाच्या ताब्यात असलेला भुखंड गायरान जमीन घोषित करून नगरपरिषदेला हस्तांतरित करण्यात आला असून, उक्त हस्तांतरण प्रक्रिया मुख्य अभियंता यांनी त्यांचेकडे अतिरिक्त कार्यभार असताना शासनाच्या परवानगीशिवाय केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमिनी गायरान असल्यास त्यावर जलसंपदा विभागाने विश्रामगृह, गोदामे, उपविभागीय कार्यालय व निवासस्थाने याचे बांधकाम करण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच, उक्त जमिनीचे चुकीच्या पध्दतीने केलेले हस्तांतरण व याचप्रकारे अनेक प्रकरणांमध्ये जलसंपदा विभागाच्या गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी संघटीत गैरव्यवहार केले असून, याबाबत सामाजिक संघटना व स्थानिक नागरिकांनी तक्रार करुनही त्यांचे विभागातील वरीष्ठ अधिकाऱ्यांशी आर्थिक संगनमत असल्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्यास जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

सिल्लोड येथील सर्वे नं.४ मधील १.५६ हेक्टर जमीन ७/१२ नोंदी नुसार जलसंपदा विभागाच्या नावाने नव्हती. परंतु, सदर जमीन अंदाजे ५० ते ६० वर्षापासून जलसंपदा विभागाच्या ताब्यात होती. सदर जमीनीवर पाटबंधारे विभागाचे ५० ते ६० वर्षापूर्वीच गोदामे, उपविभागीय कार्यालय व निवासस्थाने यांचे बांधकामे केलेले होते.
(३) हे खरे नाही.

जलसंपदा विभागाच्या ताब्यात असलेली जमीन सिल्लोड नगर परिषदेने हस्तांतरण करून देण्याबाबत जलसंपदा विभागास विनंती केली होती. त्यानुसार नियामक मंडळात ठरावास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सदर जागा जिल्हाधिकारी यांचे मार्फत महसूल संहितेनुसार प्रक्रिया पूर्ण करून हस्तांतरीत केली आहे. तसेच शासनाने सदर जमिनेचे भोगाधिकार मुल्य मंजूर केले असून, शासन खाती जमा करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सार्वजनिक बांधकाम मंडळात ई-निविदा न काढताच निवडक कंत्राटदारांना कोट्यवधींची कामे दिल्याबाबत

**(१७) * १९४ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील सार्वजनिक बांधकाम मंडळातील तत्कालीन अधीक्षक अभियंता यांनी अधिकार नसताना हेतुपरस्पर ई-निविदा प्रक्रिया डावलून निवडक कंत्राटदारांच्या माध्यमातून रुपये ५० कोटींहून अधिक रकमेची कामे मंजूर केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामात गैरव्यवहार झाला असून मुख्य अभियंता यांनी दिशाभूल करणारा चौकशी अहवाल सादर केल्याचे लक्षात आल्यानंतर विभागाने नव्याने चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित अधीक्षक अभियंता व अन्य दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) विषयांकीत प्रकरणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालात त्रुटी आढळून आल्याने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांना सविस्तर छाननी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.
(३) व (४) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर, अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ग/दक्षिण विभागातील अनेक प्रभागांत अपुरा पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(१८)** * **१८६ श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ग/दक्षिण विभागातील अनेक प्रभागांत अपुरा पाणीपुरवठा होत असल्याबाबतची बाब स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १ डिसेंबर, २०२४ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या निदर्शनास आणून दिली असतानाही सदरहू समस्येचे निराकरण करण्यात महानगरपालिकेस अद्यापही यश आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागात हजारो नागरिक वास्तव्यास असून अनेक निर्माणाधीन असलेल्या इमारतीत हजारो रहिवाशी वास्तव्यास येणार असल्याने भविष्यात पाणी प्रश्न अधिक बिकट होण्याची दाट शक्यता निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ग/दक्षिण विभागातील अनेक प्रभागांत सद्य:स्थितीत सुरू असलेल्या अपुऱ्या पाणी पुरवठ्याच्या समस्येचे निराकरण करण्याबाबत तसेच भविष्यात होणारी पाणी टंचाई रोखण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

अपुऱ्या पाणीपुरवठ्याच्या समस्याचे निराकारण तातडीने करण्याकरीता जलवाहिनीवरील झडपांची योग्य प्रमाणात उघडझाप करुन पुरेशा प्रमाणात जलवितरण करण्यात येते. जुन्या व जीर्ण झालेल्या

जलवाहिन्या आवश्यकतेनुसार बदलण्यात येत आहेत व जलवाहिन्यांचे आकार वाढविले जात आहेत. तसेच, पाणीगळती होत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ पाणीगळती रोखली जाते.

भविष्यात होणारी पाणीटंचाई रोखण्याच्या दृष्टीने जास्त क्षेत्रफळ असलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना सांडपाणी प्रक्रिया सयंत्र (एस.टी.पी.) तसेच वर्षा संचयन सयंत्र बांधणे अनिवार्य आहे. भविष्यातील मुंबई शहराची पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता महानगरपालिकेकडून नवीन धरणे (जलाशय) तसेच समुद्राच्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्यासाठी निःक्षारीकरण प्रकल्प बांधण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील भिमा -सीना नदीवर बॅरेजेस बांधण्याबाबत

**(१९) * ९८५ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरणापासून कर्नाटक हद्दीपर्यंत भिमा नदीवर कोल्हापुर पध्दतीचे १७ बंधारे अस्तित्वात असून सद्य:स्थितीत ते जीर्ण झाली असून वारंवार दुरुस्ती करुनही गळती बंद झालेली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात उजनी धरण पूर्ण भरल्यानंतर अतिरिक्त पाणी भीमा नदीत सोडले जाते, प्रतिवर्षी अंदाजे ५० टीएमसी पेक्षा जास्त पाणी वाहून कर्नाटकात जाते, कर्नाटक शासनाने भीमा नदीत बॅरेजेस बांधणे सुरू केले आहे त्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील जलसंपदा विभागाने यावर अभ्यास करून माहे मे, २०२२ मध्ये सोलापूर जिल्ह्यात भिमा नदीवर ११ बॅरेजेस बांधण्याचा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील भीमा व सिना नदीवर बॅरेजेस बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

उजनी धरणापासून कर्नाटक हद्दीपर्यंत भिमा नदीवर कोल्हापूर पध्दतीचे २० बंधारे अस्तित्वात आहेत. त्यापैकी ४ बंधाऱ्यांची मोठ्या प्रमाणात दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

(२) व (३) अंशतः खरे आहे.

उजनी धरणातून सन १९८१ ते २०२० या कालावधीत सांडव्यावरून वाहून गेलेल्या पाण्याच्या उपलब्ध आकडेवारीनुसार ७५% विश्वासार्हतेने ५९ अब्ज घनफूट (टिएमसी) पाणी सांडव्यावरून वाहून गेल्याचे दिसून येत आहे.

दिनांक ०७/०८/२०२४ रोजी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली जलसंपदा विभागातील विविध प्रलंबित योजनांबाबत संपन्न बैठकीत भीमा व सिना नदीवरील को.प. बंधाऱ्याचे बॅरेजेसमध्ये रुपांतरण करण्यासाठी भीमा व सिना नदीचे सर्वेक्षण व अन्वेषण करणेबाबत निर्देश देण्यात आले आहे. को. प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रुपांतरण करण्याकरीता नदीपात्राचे सर्वेक्षण, अन्वेषण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

सद्य:स्थितीत अस्तित्वातील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे बॅरेजेसमध्ये रूपांतर करणेबाबतचे शासनाचे धोरण निश्चित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून धोरण निश्चित झाल्यानंतर याबाबतीत अंतिम निर्णय घेणे अभिप्रेत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिका प्रशासनाकडून चिकनगुनिया आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२०) * ७९८ श्री.वसंत खंडेलवाल, श्री.राजहंस सिंह, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: अकोला महानगरपालिकेच्या हद्दीत चिकनगुनिया या आजाराचा संसर्ग दिवसेंदिवस वाढत असून राज्यात सुमारे ४७९२ एवढे रुग्ण तसेच अकोला महानगरपालिका हद्दीत ३०७ रुग्ण आढळून आल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहरात देखील सर्वाधिक चिकनगुनियाचे रुग्ण असून गेल्या वर्षभरात ७३५ रुग्णांची नोंद बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयांत करण्यात आली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच अकोला महानगरपालिका प्रशासनाकडून चिकनगुनिया या आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(४) असल्यास, राज्यातील चिकनगुनिया या आजाराचा संसर्ग रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यात सन २०२४ मध्ये चिकनगुनियाचे ५८५२ रुग्ण व १ ते ३१ जानेवारी २०२५ दरम्यान २३२ रुग्ण आढळून आले.

अकोला महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये सन २०२४ मध्ये चिकनगुनियाचे ३४९ रुग्ण आढळून आले. १ ते ३१ जानेवारी २०२५ दरम्यान २५ रुग्ण आढळून आले आहेत.
(२) हे अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये सन २०२४ मध्ये चिकनगुनियाचे ७४३ रुग्ण व १ ते ३१ जानेवारी २०२५ दरम्यान ४२ रुग्ण आढळून आले आहेत.
(३) व (४) राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये चिकनगुनिया आणि डेंग्यू प्रादुर्भाव नियंत्रित करण्याकरीता दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. याअनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत.

चिकनगुनिया या आजाराचा संसर्ग रोखण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच महानगरपालिकांच्या आरोग्य विभागाद्वारे जलद ताप सर्वेक्षण, डासअळी नाशक फवारणी (फॉगींग) धुर फवारणी, गप्पी मासे सोडणे व इतर आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. नागरीकांना असे कीटकजन्य आजार रोखण्याबाबत आरोग्य शिक्षण देण्यात येत आहे.

राज्यातील महानगरपालिकांना डेंग्यू चिकनगुणिया या आजाराच्या सर्वेक्षणासाठी ब्रीडिंग चेकर्सच्या माध्यमातून मनुष्यबळ पुरवठा करण्यात येतो. तसेच वैद्यकिय अधिकारी व रुग्णालयीन कर्मचारी यांना प्रशिक्षित केले जात आहे. या आजाराच्या निश्चित निदानासाठी राज्यामध्ये ५० प्रयोगशाळा कार्यान्वित आहेत. त्याद्वारे चिकनगुनिया आजाराकरीता रक्तजल नमुन्यांची तपासणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड शहरातून वाहणाऱ्या गोदावरी नदीपात्रातून जलपर्णी काढून पाणी दूषित न होण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(२१)** * **६२५ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातून वाहणाऱ्या गोदावरी नदीच्या पात्रात सांडपाणी सोडले जात असून नदीपात्रात मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाढली असल्याने अन्य कचरा, घाण पाण्यात साचून नदीतील पाणी दूषित होऊन पाण्यातील जीवसृष्टीला धोका निर्माण झाला असून डासांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी नदीतील जलपर्णी काढून पाणी दूषित होणार नाही यासाठी उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी तेथील नागरिकांसह पर्यावरणप्रेमी यांनी वारंवार महानगरपालिका प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन गोदावरी नदी पात्रातील जलपर्णी काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली असून याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या व दोषी आढळून आलेल्या संबंधित महानगरपालिका अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये गोदावरी नदी वाहते. गोदावरी नदीतील जलपर्णी तात्काळ काढून पाणी दूषित होणार नाही यासाठी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांसह पर्यावरणप्रेमीनी महानगरपालिकेकडे केली होती. त्यास अनुसरून महानगरपालिकेमार्फत जलपर्णी काढण्याचे काम यापूर्वी वेळोवेळी करण्यात आले आहे.

नांदेड शहरातून गोदावरी नदीच्या पात्रात जाणाऱ्या नाल्याच्या पाण्यावर उपाययोजना करण्यासाठी राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत गोदावरी नदीचे उस्माणशाही नाला / चुनाल नालाद्वारे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी १० द.ल.लि. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्याच्या रुपये १७.४१ कोटी किंमतीच्या कामास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली असून सदरील काम पूर्ण झालेले असून सद्य:स्थितीत चुनाल नाल्याचे पाणी नदी पात्रात मिसळत नाही.

केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानंतर्गत नांदेड वाघाळा शहराच्या रुपये ३२९.१६ कोटी किंमतीच्या मलनिःस्सारण प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली असून सद्य:स्थितीस सदर प्रकल्पाचे ६० % काम पूर्ण झालेले असून सदर प्रकल्पाचे कार्यान्वयन झाल्यानंतर अशुध्द पाण्यावर प्रक्रिया केल्याने गोदावरी नदीचे गोदावरी नदीचे पाणी अशुध्द होणार नाही व पाण्यात जलपर्णी निर्माण होणार नाही. तसेच,सद्य:स्थितीत नांदेड महानगरपालिका हद्दीतील गोदावरी नदीच्या पाण्यात जलपर्णी वनस्पती आढळून आलेली नसल्याचे नांदेड वाघाळा महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## पार-गोदावरी एकात्मिक नदी जोड योजनेच्या अंमलबजावणीबाबत

**(२२) * ३५९ श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यासाठी जलसंजीवनी ठरणाऱ्या नार-पार खोऱ्यातील अतिरिक्त पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी पार-गोदावरी ही एकात्मिक नदी जोड योजना राबविण्याची मागणी दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ) यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पायरपाडा आणि गुगुळ प्रवाही वळण (जि.नाशिक) योजनांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ) यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कायमस्वरूपी अवर्षणप्रवण असलेल्या नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, चांदवड, येवला, नांदगाव, वैजापूर व गंगापूर तालुक्यातील सिंचनासाठी नार पार खोऱ्यामधील उर्वरित सर्व पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी पार-गोदावरी एकात्मिक नदी जोड प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.

(२) होय.

पायरपाडा आणि गुगुळ प्रवाही वळण (जि.नाशिक) योजनांची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

प्रवाही वळण योजना पायरपाडा ता.दिंडोरी जि.नाशिक ही योजना उर्ध्व गोदावरी प्रकल्पांतर्गत चतुर्थ सुप्रमामध्ये समाविष्ट असून चतुर्थ सुप्रमा शासन निर्णय क्र.सुप्रमा-०२११/(प्रक्र-३७/२१) मोठे प्रकल्प-१, दिनांक ०३/११/२०२२ अन्वये मान्यता प्राप्त आहे. सदर योजनेची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून फेब्रुवारी-२०२५ अखेर काम सुरू करण्याचे नियोजन आहे.

गुगुळ प्रवाही वळण योजनेच्या सर्वसाधारण आराखड्यास प्राधिकरण कार्यालयाचे दिनांक १४/०८/२०२४ पत्रान्वये मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुषंगाने योजनेचे सविस्तर अन्वेषण व प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) सद्य:स्थितीत उपलब्ध पाण्याचे परिगणन करताना पार गोदावरी नदी जोड योजना क्र. ३ व ४ करीता मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई यांनी उपलब्ध करून दिलेल्या एकूण ८५.४१ द.ल.घ.मी. पाण्यामधून उर्ध्व बाजूचा एकूण पाणी वापर ४०.१५ द.ल.घ.मी. वजा करून उर्वरीत ४५.११ द.ल.घ.मी. पाणी सद्य:स्थितीत उपलब्ध असल्याचे जलविज्ञान नाशिक यांचे मार्फत दिनांक २७/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाकरीता ४०.१५ द.ल.घ.मी. ची तूट आहे.

प्रस्तावित पार-तापी-नर्मदा प्रकल्प रद्द झाल्याने महाराष्ट्र राज्यांतर्गत प्रकल्पांसाठी पाणी उपलब्ध होत आहे. प्रस्तावित पार-तापी-नर्मदा प्रकल्प रद्द झाल्याने पार-तापी-नर्मदा योजनेतून उपलब्ध होत असलेल्या पाण्याचा पार-गोदावरी योजना तसेच इतर राज्यांतर्गत तुटीच्या खोऱ्यातील योजनांकरीता वळविण्याबाबत तसेच पार-तापी-नर्मदा योजनेतून उपलव्ध होणारे पाणी पार-गोदावरी योजनेकरीता अधिकाधिक वापर करण्याच्या दृष्टीने तलांकनिहाय मर्यादा न ठेवता सविस्तर अभ्यास करून अहवाल शासनास सादर करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पूढील कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८४ मधील निवृत्तीवेतनाच्या अंशराशीकरणाच्या पुनर्स्थापना कालावधीबाबत

**(२३) * ६२२ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४ मधील क्र.५(१) नुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या निवृत्तीवेतनाच्या ४०% पेक्षा अधिक होणार नाही एवढ्या भागाचे एक ठोक रक्कमेतील प्रदानासाठी दिलेल्या दरानुसार अंशराशिकरण करता येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोषागारातून निवृत्तीवेतन घेणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना महालेखापालाने काढलेल्या प्राधिकार पत्रानुसार अंशराशिकरणाच्या मुल्याची रक्कम देऊन सदर रक्कम ज्या दिनांकास मिळेल / बँक खात्यात जमा केली असेल तो दिनांक / लेखापरीक्षा अधिकारी यांने निवृत्तीवेतनाचे अंशराशिकृतमुल्य प्रदान करण्यासाठी प्राधिकृत पत्र दिल्यानंतर तीन महिन्यांचा अखेरचा दिनांक यापैकी जो दिनांक पहिला येईल त्या दिनांकापासून अंशराशिकरणाची रक्कम परतफेडीसाठी निवृतीवेतनातून कपात करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अंशराशिकरणाच्या मुल्याची रक्कम पुढील १५ वर्षे कपात करुन ती रास्त व्याजदराच्या (८%) पटीने जास्तीचे वसुल होत असून, जर जास्त व्याजदराच्या ८ % या दराचा हिशोब केल्यास ही अंशराशिकरणाची परतफेड १३५ महिन्यात म्हणजे ११ वर्ष ३ महिन्यात किंवा त्यापेक्षाही कमी कालावधीसाठीच करणे समर्थनीय व उचित ठरते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सध्याच्या १८० महिने / १५ वर्षांपर्यंत अशी वसुली करणे म्हणजे एक प्रकारे अनावश्यक व अतिरिक्त ठरत असून दिर्घ कालावधीसाठीच्या अनावश्यक वसुलीस स्थगिती देवुन ही वसुली ११ वर्षे ३ महिने एवढ्या कालावधीची करण्याबाबत संबंधित निवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

प्रस्तुत अंशराशीकरणाची बाब ही ऐच्छिक स्वरुपाची असून अंशराशीकरणाची मुल्य व निवृत्तीवेतनातून होणारी कपात याबाबतचे सुत्र महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ नियमात स्पष्ट आहेत.त्या सुत्रानुसार अंशराशीकरणाचे मुल्य निश्चित करण्यात येते व जो कर्मचारी या नियमाच्या अटी व शर्ती मान्य करतो त्यास ती प्रदान करण्यात येते. अंशराशीकरणाच्या रकमेची करण्यात येणारी कपात नियमानुसार १५ वर्षात करण्यात येत असल्याने एकूण कपातीची रक्कम ही अंशराशीकृत रकमपेक्षा अधिक असल्याचे दिसत असले तरी शासनाकडून करण्यात येणाऱ्या कपातीचा सरासरी व्याजदर कमी असल्याने ८ टक्के दराने कपात करण्यात येते ही बाब खरी नाही.

हे लक्षात घेता अंशराशीकृत रकमेचा पुनर्स्थापित करण्याचा कालावधी १५ वर्षे कमी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिवडी- न्हावा शेवा अटल सेतूवरील पथकर कमी करण्याबाबत

**(२४) * ५०२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवरुन सन २०२४ या वर्षात वाढत्या टोल दरांमुळे अपेक्षेपेक्षा ४२ टक्के कमी वाहतूक झाली असून दररोज सरासरी ३९ हजारांऐवजी अंदाजे २२ हजार वाहनांनी या सेतूचा वापर केला असल्याची बाब मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रसिध्दी पत्रकातून दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावर किमान पथकर २५० ते ५०० रुपये इतका असल्यामुळे अनेक वाहने या मार्गाऐवजी जुन्या मार्गांचा वापर करित असल्याचे निदर्शनास आले असून या अटल सेतूसाठी आकारण्यात येणारा पथकर जास्त प्रमाणात असल्याने या सेतूवरुन प्रवास करण्यास प्रवाशांकडून टाळाटाळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यावरील पथकर कमी करण्याची मागणी वाहनधारकांनी तसेच विविध संघटनांनी शासनाकडे वेळोवेळी केली असून पथकर कमी केल्यास वाहनांची संख्या वाढून उत्पन्नात वाढ होणार असून सदर प्रकरणी शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, अटल सेतुवरून सार्वजनिक वाहतूक तसेच मासिक पास योजना सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) केंद्र शासन व राज्य शासनामार्फत पथकर आकारणीसंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व धोरणांच्या आधारे पथकराच्या दरासंदर्भात अभ्यास करून वाहनधारकांना कमीत कमी रुपये २५० इतका सवलतीच्या दरात प्रोत्साहनात्मक पथकर दर लागू केला आहे.

अटल सेतू वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर माहे जानेवारी, २०२४ ते माहे ऑक्टोबर, २०२४ पर्यंत मासिक सरासरी वाहनसंख्या ६,५६,२६४ इतकी होती. तदनंतर मुंबईतील इतर टोलनाके (वाशी, ऐरोली, मुलुंड इ.) माहे ऑक्टोबर पासून टोलमुक्त करण्यात आले. तदनंतर देखील माहे नोव्हेंबर, २०२४ ते माहे जानेवारी, २०२५ पर्यंत अटल सेतूवरील मासिक सरासरी संख्या वाहनसंख्या ७,४२,१६६ इतकी असून अटल सेतूचा वापर करणाऱ्या वाहनांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचेच निदर्शनास येते. सबब, पथकराच्या दरामुळे अटल सेतूवरून प्रवास करण्यास प्रवाशांकडून टाळाटाळ होत असल्याची बाब दिसून येत नाही.

त्याचबरोबर सदर सेतूवरील वाहनांची संख्या वाढविण्याकरीता अटल सेतूच्या वाहतुकिकरण व्यवस्थेचा (Traffic dispersal System) भाग म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे शिवडी-वरळी उन्नतमार्ग तसेच नवी मुंबईमध्ये चिर्ले ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग जोडमार्ग या प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचप्रमाणे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लवकरच कार्यान्वित होणे अपेक्षित आहे. सदरहू प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई किनारी रस्ता ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गादरम्यान वेगवान दळणवळण शक्य होणार असल्याने अटल सेतूवरून प्रतिदिन प्रवास करणाऱ्या वाहनांची संख्येत वाढ होणे अपेक्षित आहे.

(४) अटल सेतूच्या वापराकरीता पथकर दर निश्चित करण्याबाबत निर्गमित अधिसूचनांनुसार अटल सेतूच्या वापराकरीता दैनिक व मासिक पास सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील शाळेचा बांधकाम परवाना रद्द असतानाही अनधिकृतरित्या शाळा सुरु असल्याबाबत

**(२५)** * **१०६८ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहगड सिटी स्कूल, टिळेकरनगर, कोंढवा बुद्रुक, पुणे या शाळेच्या इमारतीचे बांधकाम परवाना पुणे महानगरपालिकेने रद्द केला असतानाही सदर अनधिकृत इमारतीमध्ये शाळा सुरू असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शैक्षणिक इमारती मंजूर करताना प्रस्ताव नकाशामध्ये पोहोच रस्ता उत्तर पूर्व दिशेस दर्शविलेला आहे, परंतु सद्य:स्थितीत हा रस्ता उक्त जागेवर उपलब्ध नाही अथवा विकसित करण्यात आलेला नाही, त्यामुळे शाळेचा प्रस्ताव मान्य करतेवेळी पोहोच रस्त्याबाबत नकाशावर विपर्यस्त माहिती दर्शवून पुणे महानगरपालिकेची फसवणूक करुन नकाशे मंजूर करुन घेतले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोहोच रस्ता उपलब्ध नसल्याने महानगरपालिका शहर अभियंता कार्यालय, पुणे यांनी दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास आदेश काढून बांधकाम परवानगी रद्द केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळेने सन २०१० मध्ये केलेले स्थलांतरण बेकायदा असल्याचे पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी शिक्षण उप संचालक पुणे, यांना डिसेंबर, २०२२ मध्ये दिलेल्या अहवालात नमूद केले असूनही शिक्षण विभागाने या अहवालावर दोन वर्षात कोणतीही कार्यवाही न करता या बेकायदेशीर सुरू असलेल्या शाळेला मदतच केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शैक्षणिक इमारतीचे भोगवटा पत्र घेण्यात आलेले नसताना इमारतीचा विनाभोगवटा वापर सुरु असून सदर इमारतीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या जीवीतास धोका निर्माण झाला असून सदर अनधिकृत इमारतीमध्ये माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान विजेचा धक्का लागून एका बसचालकाचा मृत्यू होऊनही महानगरपालिकेने या बांधकामावर कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पुणे येथे सुरु असलेल्या अनधिकृतरित्या शाळेची शासनाने सखोल चौकशी करून अनाधिकृत इमारतीत शाळा चालविणाऱ्या संस्था चालकांवर कारवाई केली आहे काय, तसेच या बांधकामावर कोणतीही कारवाई न करणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिकेने शाळेची मान्यता काढणेबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक, पुणे यांचेकडे सादर केला असून शिक्षण विभागाकडून त्याबाबत प्रचलित शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रावळपाडा (दहिसर) तसेच आकुर्ली (कांदिवली) येथील प्रसुतिगृहे पूर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबत

**(२६) * ११७५ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रावळपाडा (दहिसर) तसेच आकुर्ली (कांदिवली) येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे प्रसुतीगृह सुरु करण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही प्रसुतीगृहे अद्याप पूर्ण क्षमतेने सुरु नसल्याने प्रसुतीसाठी आलेल्या महिलांना अन्य रुग्णालयात पाठविले जात असून सदर प्रसुतीगृह पूर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे व शासनाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता सदर दोन्ही प्रसुतीगृहांचे नुतनीकरण करुन मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाची निर्मिती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेडे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोन्ही प्रसुतिगृहे पूर्ण क्षमतेने सुरु करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेने व शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

कांदिवली पुर्व दामूपाडा येथे स्थलांतरीत आकुर्ली प्रसुतिगृह हे पूर्ण क्षमतेने चालू आहे व तेथे सर्व प्रसुती व बालरोग सुविधा उपलब्ध आहेत.

दहिसर पूर्व येथील रावळपाडा प्रसुतिगृह येथे नैसर्गिक प्रसुती सेवा व बालरोग सेवा उपलब्ध आहेत. सदर प्रसुतिगृहातील शस्त्रक्रिया गृह पुढील ३ महिन्यात कार्यान्वित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे. सद्य:स्थितीत शस्त्रक्रिया करण्यासाठी तेथून १ किमी अंतरावरील बोरीवली पूर्व प्रसुतिगृहाची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०४ जानेवारी, २०२५ रोजी महानगरपालिका आयुक्त यांच्या सोबत झालेल्या बैठकीमध्ये रावळपाडा प्रसुती गृह पूर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबतची मागणी केली आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १०/०१/२०२४ रोजी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सोबत झालेल्या बैठकीत आकुर्ली प्रसुतीगृहाचे नुतनीकरण करुन मल्टीस्पेशलिटी रुग्णालय उभारण्याची मागणी केली आहे.

(४) आकुर्ली प्रसुतीगृह हे दामुपाडा कांदीवली (पूर्व) येथे पूर्ण क्षमतेने चालू आहे. आकुर्ली पुर्व प्रसुतीगृहाची मूळ इमारत निष्कासित करुन ९ मजल्याच्या इमारतीत दवाखान्याची पुर्नबांधणी व नुतनीकरण करण्यात येत आहे.

रावळपाडा प्रसुतीगृह येथे नैसर्गिक प्रसुती व बालरोग सेवा उपलब्ध आहेत. येथे शस्त्रक्रिया गृह कार्यान्वित करण्याकरीता महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

या दोन्ही प्रसुतीगृहात तज्ञ डॉक्टर उपलब्ध करुन देण्यात येत असून आवश्यक साधन सामुग्री व कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यात टेंभू योजनेंतर्गत राबविल्या जाणाऱ्या बंदिस्त पाईपलाईन योजनेची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत

**(२७) * १२२१ श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिघंजी, पांढरेवाडी, उंबरगाव, धडसवाडी, आंबेगाव, बोंबेवाडी, पिंपरी (ता.आटपाडी, जि.सांगली) या दुष्काळी गावांमध्ये वरदान ठरणाऱ्या टेंभू योजनेच्या बंदिस्त पाईपलाईनची करण्यात येत असलेली कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याने स्थानिकांनी बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावांमध्ये स्थानिकांच्या मागणीनुसार कामे करून आंबेवाडी,बोंबेवाडी,पिंपरी खुर्द, विठ्ठलापूर, उंबरगाव, पुजारवाडी, पांढरेवाडी (दि), दिघंची या गावांना पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करण्यासाठी व या योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.
(२) विस्तारीत टेंभू उपसा सिंचन योजनेंतर्गत कामथ गुरुत्व नलिका या कामाद्वारे आंबेवाडी, बोंबेवाडी, पिंपरी खुर्द, उंबरगाव, पुजारवाडी, पांढरेवाडी (दिनांक ) व दिघंची या गावांमध्ये बंदिस्त नलिका वितरण प्रणालीची कामे सुरु आहेत. तसेच, विठ्ठलापूर व दिघंची या गावांना टेंभू उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत आटपाडी डावा कालवा किमी १ ते किमी १० अंतर्गत निंबवडे वितरीका मार्फत निंबवडे ल.पा. प्रकल्पातुन H.R.Gate द्वारे गळवेवाडी, विठ्ठलापूर, कौठुली, लोटेवाडी देशमुखवाडी येथील ओढ्यातील बंधारे व को.प.बंधाऱ्यासाठी ५५ द.ल.घ.फु. पाणी माहे जानेवारी-फेब्रुवारी २०२५ मध्ये देण्यात आले आहे. दिघंची वितरीका मार्फत मौजे दिघंची यादव मळा को.प. बंधाऱ्यासाठी ३० द.ल.घ.फु. पाणी जानेवारी-फेब्रुवारी २०२५ मध्ये देण्यात आले आहे.

दिघंची व विठ्ठलापुर या गावांमधील को.प. बंधाऱ्यांसाठी कामथ गुरुत्व नलिका या कामाच्या निविदेमध्ये भरण नलिकेची तरतूद केली आहे.

सद्य:स्थितीत विस्तारीत टेंभू योजनेंतर्गत कामथ गुरुत्व नलिकेचे काम प्रगतीपथावर असून सदर काम ३ वर्षांत पूर्ण करणेचे नियोजित असून सदर कामे निविदेमधील विनिर्दीष्टांनुसार करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील अवैध दारू विक्री रोखण्याकरीता उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(२८) * १५०३ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील प्रमुख शहरांसह गावांमध्ये प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे देशी, विदेशी, हातभट्टीच्या दारुची अवैध विक्री होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील बहुतांश युवावर्ग दारुच्या आहारी गेला असून गावांगावांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून हिंगोली जिल्ह्यातील वाढलेल्या अवैध दारू विक्रीमुळे अनेक नागरिक नशेच्या आहारी जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सदर अवैध दारू विक्री रोखण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे तसेच संबंधित प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) व (२) हे खरे नाही.

अवैध हातभट्टी विक्री बाबत प्रशासनाचे दूर्लक्ष होत नसून प्रशासनामार्फत अवैध मद्यविक्रीबाबत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

नाताळ, नववर्ष इ. सण व उत्सवाच्या कालावधीमध्ये अवैध मद्याविरुध्द विशेष मोहीम राबवून सर्व प्रकारच्या गैरप्रकारांवर अंकुश ठेवण्याच्या सूचना आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्यामार्फत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना माहे डिसेंबर, २०२४ मध्ये देण्यात आल्या होत्या. त्यानुसार, हिंगोली जिल्ह्यात माहे डिसेंबर, २०२४ मध्ये प्रशासनातर्फे राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेदरम्यान करण्यात आलेल्या कारवायांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| | **दाखल गुन्हे** | **अटक आरोपी** | **जप्त वाहन** | **जप्त मुद्देमाल रुपये (लाख)** |
|---|---|---|---|---|
| राज्य उत्पादन शुल्क | ६१ | ६२ | ७ | १२.०९ |
| पोलीस प्रशासन | १०६ | १०८ | १२ | १०.५७ |

(३) हिंगोली जिल्ह्याकरीता राज्य उत्पादन शुल्क विभागाचे जून २०२४ मध्ये स्वतंत्र जिल्हा भरारी पथक मंजूर करण्यात आले असून सर्व प्रकारच्या अवैध दारू व्यवसायांवर नियमीत आणि सातत्यपूर्वक कारवाई व छापे मोहिम राबविण्यात येत आहेत.

याशिवाय पोलीस विभागाकडून अवैध हातभट्टी विरुध्द कारवाया करण्यात येतात.
(४) लागू नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेने सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहीमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(२९) * १५२१ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिकेने सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहीम हाती घेतली असून या मोहिमेदरम्यान शहरात एकूण १५१२ संशयित क्षयरुग्ण आढळून आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निदानाअभावी अद्यापही उपचारापासून वंचित असणाऱ्या क्षयरुग्णांचा प्रशिक्षित पथकाद्वारे शोध घेऊन त्यांच्यावर औषधोपचार सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, त्यानुषंगाने अद्यापपर्यंत किती रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, दिवसेंदिवस क्षय रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असून क्षयरोग वाढीला आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) नवी मुंबई कार्यक्षेत्रात सक्रिय क्षयरोग शोध मोहिम घेतली असता, दिनांक २३/१२/२०२४ ते दिनांक ०३/०१/२०२५ या कालावधीत एकूण १५४२ संशयित क्षयरोग रूग्ण आढळून आलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

सदर रूग्णांच्या तपासणीअंती ४० क्षयरूग्णांचे निदान झाले असून, त्यांच्यावर औषधोपचार सुरू आहेत.

(३) राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार एकूण १५७५६७ लोकसंख्येत ८० प्रशिक्षित शोधपथकांमार्फत सर्वेक्षण करण्यात आले असून, क्षयरोग बाधित रूग्णांच्या Eligible सहवासितांना सुध्दा क्षयरोग प्रतिबंधात्मक उपचार देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामांमध्ये अनियमितता झाली असल्याबाबत

**(३०) * १५३८ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्ते विकास योजनेंतर्गत जळगाव जिल्ह्यातील प्रजिमा ३१ किमी १/१९० ते ४/३०० भाग नेहरूनगर या कामांतील निविदेमध्ये पात्र असलेल्या ठेकेदारास अपात्र करून संबंधित अधिकाऱ्यांच्या मर्जीतले अपात्र ठेकेदारास पात्र करून उक्त ठेका मिळवून देण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणातील दोषी अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्यावर कारवाई करून अकार्यकारी पदावरती त्यांची बदली प्रस्तावित केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी आढळून आलेल्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) निवेदन प्राप्त आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत सदर कामाची निविदा प्रक्रिया न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील मेट्रो १२ या प्रस्तावित प्रकल्पास दिलेल्या बांधकाम परवानगीची चौकशी करण्याबाबत

**(३१) * ६३८ ॲड.अनिल परब, श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील कल्याण शिळ रोड या मार्गावर मेट्रो १२ प्रकल्प प्रस्तावित असून कल्याणहून तळोजा या मार्गाला दिनांक ६ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये एमएमआरडीएच्या माध्यमातून मंजूरी देऊन सदर प्रकल्प राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मार्गावर बांधकाम परवानगीस मंजूरी देण्याआधी एमएमआरडीएचा" ना-हरकत दाखला" कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये सादर करणे बंधनकारक असताना आवश्यक कागदपत्रांची छाननी न करता संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने बांधकामास परवानग्या मंजूर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सहा. संचालक नगररचना, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण, नगररचनाकार, कल्याण पूर्व व २७ गावे तसेच कनिष्ठ अभियंता २७ गावे या त्यांच्या अखत्यारित येत असलेल्या विभागात बेकायदेशीरपणे बांधकाम परवानगी मंजूर केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत सामाजिक कार्यकर्ता यांनी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे दिनांक १६ जानेवारी, २०२४ रोजी व यापूर्वीही हददीतील मेट्रो १२ या प्रस्तावित मेट्रो मार्गावरील दिलेल्या बांधकाम परवानगीबाबत सहा संचालक नगररचना, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, नगररचनाकार तसेच कनिष्ठ अभियंता यांना निलंबित करुन त्यांची चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीर बांधकाम परवानग्या देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात दिनांक ०६/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये, मेट्रो मार्ग-१२ (कल्याण ते तळोजा) या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर मार्गाची अंतिम रूपरेषा ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून प्रसिध्द करण्यात आलेली आहे. मेट्रो Influence Zone मधील प्रस्तावित बांधकामाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा ना-हरकत दाखला प्राप्त करून घेणेबाबतची तरतूद आहे.

त्यानुसार मेट्रो Influence Zone मध्ये प्रस्तावित असलेल्या बांधकाम परवानगी प्रस्तावास मंजूरी देणेआधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा ना-हरकत दाखला प्राप्त करून घेतल्यानंतरच महानगरपालिकेकडून बांधकाम परवानगी प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्यात येते.

(३) मेट्रो Influence Zone मध्ये प्रस्तावित असलेल्या बांधकाम परवानगी प्रस्तावास मंजूरी देणेआधी महानगरपालिकेने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा ना-हरकत दाखला प्राप्त करून घेण्यात आला असल्याने, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांत बेकायदेशीर बांधकाम परवानगी मंजूर केलेल्या आहेत, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

(४) होय, हे खरे आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्लास्टिक वापरावरील धोरणात बदल करण्याबाबत

**(३२) * ८१ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत पर्यावरण रक्षणासाठी प्रतिबंधित प्लास्टिक वापरावर कठोर कारवाई करण्याकरीता आखण्यात आलेल्या धोरणात नमूद करण्यात आलेली रक्कम फेरीवाले किंवा ग्राहक यांचेकडे नसल्याने यात सुधारणा करण्याचा विचार बृहन्मुंबई महानगरपालिका करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने यासंदर्भात प्रस्ताव तयार केला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे, सदर प्रस्तावास शासनाची मंजूरी प्राप्त झाली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने मुंबईतील प्लास्टिक बंदी करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिका अधिक्षेत्रात एकल वापराच्या प्लास्टिक बंदीच्या अधिसूचनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रशासकीय विभाग स्तरावर पथके गठीत करण्यात आली असून प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या व वस्तूंचा संग्रह, वितरण व विक्री करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात येत आहे. दिनांक २३/०६/२०१८ ते दिनांक ३१/०१/२०२५ पर्यंत कारवाई करुन रुपये ७,७१,५०,०००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्ध्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व महानगरपालिका व वैद्यकीय आस्थापनांनी नागरिकांना इच्छामरणाकरीता करावयाच्या अर्जाची ऑनलाईन प्रक्रिया राबविण्याबाबत

**(३३) * ४३५ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आजाराने ग्रस्त झालेल्या नागरिकाला सन्मानपूर्वक इच्छामरण मिळविण्याचा अधिकार असावा, यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार नागरिकांनी तसा अर्ज संबंधित महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभागामधील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे देणे क्रमप्राप्त असून, अर्ज केलेल्या व्यक्तीचा मृत्यू कोणत्याही ठिकाणी होऊ शकतो, त्यामुळे तसे झाल्यास ती माहिती त्वरित मिळावी या उद्देशाने या नोंदी ऑनलाइन करण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी राज्यातील सर्व महानगरपालिका व इतर वैद्यकीय आस्थापनांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर ऑनलाईन प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यातील सर्व महानगरपालिका /नगरपालिका/नगरपंचायती येथे Custodian यांनी Living Will एकाच Digital Platform वर जतन करुन ठेवण्यासाठी Maha IT यांचे मदतीने Digital Platform तयार करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम विस्तार कार्यक्रम राबविण्याबाबत

**(३४) * ४६० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा व पंचगंगा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी, पूर नियंत्रण व्यवस्थापन बळकट करणे, पुराचे पाणी भीमा नदीच्या खोऱ्यात वळवून त्याव्दारे भविष्यातील धोके कमी करण्यासाठी जागतिक बँकेच्या मदतीने रुपये ३ हजार २०० कोटींचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विस्तार कार्यक्रम (एमआरडीपी) राबविण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन केली असून या सुकाणु समितीव्दारे विविध प्रकल्प आराखड्यांना व वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देणे, प्रकल्प किंमतीच्या मर्यादेत बदल करणे, प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या आवश्यकतेनूसार सुधारणा करणे, आवश्यक त्या वस्तू व सेवा खरेदी प्रस्तावांना मान्यता देणे आदी कामे केली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व कामांची स्थानिक पातळीवर अंमलबजावणी करण्यासाठी कोल्हापूर, इचलकरंजी व सांगली - मिरज - कुपवाड महानगरपालिकेत स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासाठी स्वतंत्र व्यवस्थापन कक्षाची स्थापना करुन उक्त प्रकल्पाची अंमलबजावणी किती कालावधीत अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), दिनांक १३/०३/२०२४ अन्वये जागतिक बँकेच्या सहाय्याने रुपये ३ हजार २०० कोटींचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (एमआरडीपी) राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) होय.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), दिनांक ३०/०७/२०२४ अन्वये मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. प्रकल्पांचे सनियंत्रण करणे, विविध प्रकल्प आराखड्यांना व वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देणे, प्रकल्प किंमतीच्या मर्यादेत बदल करणे, प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या आवश्यकतेनुसार सुधारणा करणे, आवश्यक त्या वस्तू व सेवा खरेदी प्रस्तावांना मान्यता देणे इत्यादी कामें या समितीमार्फत केली जाणार आहेत.

(३) होय.

महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रमामध्ये कोल्हापूर, इचलकरंजी व सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील आपत्ती सौम्यीकरण कामांचा समावेश असल्याने, या तीनही महानगरपालिकांना महसूल व वन विभागाच्या दिनांक २८/११/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्प अंमलबजावणी कक्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे.

(४) या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी, देखरेख व सनियंत्रण यासाठी प्रकल्प व्यवस्थापन कक्ष व प्रकल्प अंमलबजावणी कक्ष यांची स्थापना करण्यात आली असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी ३६ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहर तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरिकांसाठी पाणी पुरवठ्याचे नियोजन करण्याबाबत

**(३५)** * **८०८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर तसेच पिंपरी चिंचवड शहराच्या पाणी नियोजनासाठी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली असून मा.उच्च न्यायालयाकडून वारंवार शासनाला पाण्याचे नियोजन कसे करणार आहात याची विचारणा करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, शासनाने संबंधित महानगरपालिकांना पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देश दिले असून सद्य:स्थितीत पाण्याचे नियोजन झाले नसल्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील बहुतांशी सर्वच गृहनिर्माण संस्थांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील बहुतांशी सर्वच गृहनिर्माण संस्थांच्या प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने तेथील परिसरात सुरळीतपणे पाण्याचे नियोजन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सद्य:स्थितीत पवना धरणातून ५२० एमएलडी आणि आंद्रा धरण निघेजे/तळवडे बंधाऱ्यातून ८० एमएलडी तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून २० एमएलडी असे एकूण ६२० एमएलडी एवढे पाणी उचलण्यात येते. त्यानंतर सदर पाणी शुध्द करुन नागरिकांना पुरविण्यात येते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसराचा वेगाने होणारा विस्तार लक्षात घेता सद्य:स्थितीत सुमारे ३५ लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्येसाठी ७५० एमएलडी एवढी पाण्याची आवश्यकता आहे.

नवीन पाणीपुरवठा योजनेंतर्गत भामा आसखेड धरणातून १६७ एमएलडी पाणी उचलणेसाठी जलवाहिनी टाकणेचे व इतर कामे प्रगतीपथावर असून डिसेंबर, २०२५ मध्ये ते पूर्ण करणेचे महानगरपालिकेचे नियोजन आहे. साठवण क्षमता वाढविण्यासाठी अतिरिक्त पाण्याच्या टाक्या व पाईप लाईन टाकणेची कामे चालू आहेत ते पूर्ण झालेनंतर कमी पाणीपुरवठा होणाऱ्या काही नवीन सोसायट्यांना पुरेसा पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात स्थावर संपदा (विनियम व विकास) अधिनियम २०१६ अन्वये नोंदणी आणि इतर शुल्क महारेराकडे जमा करण्याच्या तरतुदीमध्ये बदल केल्याबाबत

**(३६) * १०६ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्थावर संपदा (विनियम व विकास) अधिनियम २०१६ च्या कलम ७५ अन्वये नोंदणी आणि इतर बाबींपोटी जमा होणारे शुल्क महारेराकडे जमा करण्यात येते, परंतु सदरहू शुल्क शासनाकडे जमा करण्याची तरतूद नवीन गृहनिर्माण धोरणाच्या मसुद्यात करण्यात आल्यामुळे महारेराच्या स्वायत्ततेला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थावर संपदा अधिनियमात बदल करण्याचे अधिकार शासनाला नसतानाही धोरणात शुल्क हस्तांतरणाची तरतूद केल्यामुळे महारेराच्या आर्थिक स्वायत्ततेवर परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तज्ज्ञांनी या तरतुदीबाबत आक्षेप घेतल्यामुळे गृहनिर्माण विभागाने धोरणाला अंतिम रूप देताना शुल्क हस्तांतरणाची तरतूद वगळण्याचे आश्वासन देवूनही उक्त तरतुदीचा मसुद्यात समावेश केला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशीच्या अनुषंगाने महारेराच्या स्वायत्ततेवर परिणाम होणार नाही यासाठी सदरहू तरतूद वगळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अशा प्रकारची बातमी वृत्तपत्रात प्रकाशित झाली होती. गृहनिर्माण धोरण मसुद्यामध्ये मुद्दा क्र. ४.२० (४) नुसार "एकत्रित राज्य निधीची तरतूदः- महारेराकडून वसूल करण्यात येणारे शुल्क व दंड एकत्रित राज्य निधीत जमा करण्यात यावा, या निधीतून गरजेनुसार रेराच्या

कामकाजासाठी निधी वितरित केला जाऊ शकतो" अशी तरतूद प्रस्तावित करण्यात आली होती. गृहनिर्माण धोरण २०२४ चा मसुदा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन त्याबाबत नागरिकांकडून हरकती व सूचना आमंत्रित करण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने मसुद्याबाबत हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत. सदर हरकती व सूचना विचारात घेऊन शासन स्तरावर याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अचलपूर आणि चांदूरबाजार तालुक्यातील (जि.अमरावती) नाला खोलीकरण, रुंदीकरण व डोह तयार करण्याच्या निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३७) * ८३१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लघु व मध्यम पाटबंधारे विभागामार्फत राबविलेल्या अचलपूर आणि चांदूरबाजार तालुक्यातील (जि.अमरावती) नाला खोलीकरण, रुंदीकरण व डोह तयार करण्याच्या निविदा प्रक्रियेमध्ये भारतीय प्रतिस्पर्धा कायदा २००२ चे उल्लंघन केले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित निविदा प्रक्रियेमध्ये पाच कामांसाठी लाखो रुपयांची कामे मजुर सहकारी संस्थेमार्फत कोणतीही परवानगी न घेता मंजूर केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नुषंगाने काही सामाजिक संघटना व स्थानिक नागरिकांनी गत पाच वर्षातील राबविलेल्या निविदा व कामांची चौकशी करुन संबंधित कंत्राटदार व विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याची मागणी करुनही कारवाई करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने अचलपूर येथील पाच वर्षात राबविलेल्या निविदा व कामांची चौकशी करुन दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) नाही.

तथापी श्री.दिपक सुखदेवराव खडसे, एम.आय.डी.सी. प्रकल्पग्रस्त मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. वाघोली यांनी दिनांक १९/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, मध्यम व लघु पाटबंधारे विभाग, अचलपुर यांचेकडे तक्रार केली होती.

(२) नाही.

जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत १५ कामांना मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक ३०/०८/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २८/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार रुपये ५० लक्ष पर्यंतची ३३ टक्के च्या प्रमाणात ५ कामांची निविदा सुचना क्र. ०४/२०२४-२५, दिनांक ०३/०९/२०२४ अन्वये अमरावती जिल्ह्यातील मजुर सहकारी संस्थांकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर निविदेत सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे दिनांक १४/०७/२०२३ रोजीचे शासन निर्णयातील मुद्या क्र.४ नुसार ई-निविदा भरतांना मजुर सहकारी संस्थांनी कामासाठी जिल्हा संघाचा नाहरकत दाखला घेण्याची अट अंतर्भुत करण्यात आली. निविदा सुचनेतील ५ कामांकरीता प्रत्येकी ३ मजुर सहकारी संस्थेकडुन निविदा भरण्यात आली होती. निविदाकारांनी अध्यक्ष अमरावती जिल्हा मजुर सहकारी संस्थांचा संघ मर्या. अमरावती यांचे नाहरकत व आर्थीक पात्रता प्रमाणपत्र सादर केले होते. जलसंपदा विभागाचे दिनांक १८/१०/२०२३ रोजीचे शासन निर्णय नुसार ३ संस्थेकडुन निविदा भरण्यात आल्याने तांत्रिक लिफाफा उघडुन मुल्यांकन करण्यात येवुन न्युनतम देकार असलेल्या संस्थेची निविदा स्विकृत करण्यात आलेली आहे.

(३) याबाबत मागणी अथवा तक्रार प्राप्त झाली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घाटकोपर (पूर्व) (मुंबई) येथील खाजगी उद्यानातील झाडाची फांदी तुटून पादचारी महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(३८) * १७८ श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर (पूर्व) येथील एका खाजगी उद्यानातील झाडाची फांदी रस्त्यावरील पादचाऱ्यांच्या अंगावर कोसळल्याने एक महिला मृत्यूमुखी आणि दुसरी महिला गंभीररित्या जखमी झाल्याची दुर्दैवी घटना दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत रस्त्यावरील वृक्ष किंवा त्यांच्या धोकादायक फांद्या कोसळून पादचारी मृत्यूमुखी पडण्याच्या किंवा जखमी होत असल्याच्या घटना सातत्याने घडत असून यापुढे अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वृक्षांची वेळोवेळी छाटणी करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासनाने मुंबईत शासकीय, खाजगी जमिनीवरील धोकादायक वृक्ष किंवा त्यांच्या फांद्या तुटून होत असलेली जीवितहानी झाल्यास संबंधितास नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका घाटकोपर एन विभागातील न्यू कैलाश निवास प्रिमायसेस सोसायटी यांच्या खाजगी आवारातील पिंपळ या मृत झाडाची फांदी शेजारील गारोडीया नगर वेलफेयर फेडरेशन ऑफ हाऊसिंग सोसायटी यांच्या ताब्यात असलेल्या खाजगी मनोरंजन मैदानातील जॉगिंग ट्रॅकवर पडल्याने सदर मैदानात फिरायला आलेल्या श्रीमती मीनाक्षी बेन (वय ६० वर्ष) यांचा मृत्यू झाला असून श्रीमती वंदना शाह (वय ५६ वर्ष) राहणार गारोडीया नगर, घाटकोपर (पूर्व) या जखमी झाल्या.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका अखत्यारीतील रस्त्यावरील व मालमत्तेतील झाडे व झाडांच्या फांद्या कापण्याकरीता विभागवार कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आली असून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १३/०३/२०१४ च्या परिपत्रकातील तरतूदीनुसार कंत्राटदारांमार्फत झाडांचे सर्वेक्षण करून आवश्यकतेनुसार वेळोवेळी फांद्यांची/झाडांची छाटणी/कापणी करण्यात येते.
(३) सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिका अखत्यारीतील रस्त्यावरील व मालमत्तेतील झाडे/झाडांची फांदी पडून अपघातग्रस्तांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार अपघातग्रस्तांचा मृत्यू झाल्यास रुपये १,००,०००/-, कायम (Permanant) स्वरूपी अपंगत्व आल्यास रुपये ५०,०००/- व सामान्य दुखापत झाल्यास महानगरपालिकेच्या रुग्णालयात मोफत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बाळापुर (जि.अकोला) नगरपरिषदेमार्फत स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत प्रसिध्द करण्यात आलेली निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबत

**(३९) * १००२ श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापुर (जि.अकोला) नगरपरिषदेमार्फत स्वच्छ महाराष्ट्र अभियान दोन अंतर्गत बाळापुर शहराचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प डीपीआरमधील कामे करण्यासाठी बाळापुर नगरपरिषदेमार्फत निविदा सूचना सन २०२४ -२०२५ प्रकाशित केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा प्रपत्रातील शर्ती व अटी ठराविक कंत्राटदारास लाभ देण्याच्या उद्देशाने प्रेरित असून नियमबाह्य असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर निविदा प्रक्रिया रद्द करून पुन्हा प्रकाशित करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक १० मार्च, २०२४ रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनावर कोणताही विचार न करता निविदा प्रक्रिया पूर्ण करून ठराविक कंत्राटदाराला नियमबाह्य पध्दतीने (वर्क ऑर्डर) कार्यादेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन घनकचरा व्यवस्थापनांतर्गतची कामे करण्यास नियमबाह्य निविदा प्रक्रिया राबविणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच सदरची निविदा प्रक्रिया रद्द करुन पुन्हा निविदा काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बाळापूर शहराचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प डीपीआरमधील कामे करण्यासाठी बाळापूर नगरपरिषदेमार्फत निविदा सूचना दिनांक २७/०९/२०२४ रोजी तीन वर्तमान पत्रामध्ये प्रकाशित केली आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर निविदा प्रपत्रातील शर्ती व अटी प्रचलित नियमानुसार समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबत मा.विधानपरिषद सदस्य यांचे दिनांक ०३/१०/२०२४ रोजीचे पत्र जिल्हाधिकारी, अकोला यांना प्राप्त झाले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निम्न पैनगंगा (जि.यवतमाळ) प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील कामाला काही गावांचा विरोध असतानाही प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आल्याबाबत

**(४०) * ६३३ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यातील पैनगंगा नदीवरील निम्न पैनगंगा प्रकल्पाला पहिल्या टप्प्यातील कामांमध्ये यवतमाळ जिल्ह्यातील ११ आणि नांदेड जिल्ह्यातील ७ ग्रामपंचायतीचा समावेश असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील कामाला काही गावांचा विरोध असतानाही त्याकडे दुर्लक्ष करीत शासनाकडून प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाच्या सुधारित अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता आवश्यक असून त्यासाठी या प्रकल्पावरील दोषाबाबत व फेरनियोजनाबाबत राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे केलेल्या तांत्रिक तपासणी अहवालाच्या त्रुटीपूर्ततेच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, प्रकल्प अधिकारी हे दलालांमार्फत स्थानिकांना अधिकच्या लाभाचे अमिष दाखवून त्यांची फसवणूक करत असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिकांचा विरोध असतानाही प्रकल्पाचे काम सुरु करण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

प्रथम टप्प्यातील १८ पैकी १७ ग्रामपंचायती ह्या पेसा कायद्या अंतर्गत येत असल्यामुळे या १७ ग्रामसभेची संमती आवश्यक असून प्रथम टप्प्यातील यवतमाळ व नांदेड जिल्ह्यातील १८ गावात विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. त्यामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील ११ पैकी ०८ ग्रामसभेनी तसेच नांदेड जिल्ह्यातील ०७ पैकी ०१ ग्रामसभेने वैयक्तिक लाभाच्या अटीच्या अधीन राहुन प्रकल्पास समर्थन दिले आहे. त्यानुसार भुसंपादन व पुनर्वसनाची कार्यवाही महसूल विभागामार्फत प्रगतीपथावर आहे. उर्वरीत ९ ग्रामपंचायती बाबत भुसंपादन व पुनर्वसन कायदा २०१३ अंतर्गत कलम ४१ (३) व पंचायत (अनुसुचीत क्षेत्रांचा विस्तार) अधिनियम १९९६ मधील कलम-२६ अन्वये पेसा ग्रामपंचायती करीता महसूल यंत्रणेमार्फत कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्यानंतर सदर गावांमध्ये भुसंपादन व पुनर्वसनाची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(२) प्रकल्पावरील दोषाबाबत व फेरनियोजनाबाबत राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्याकडून प्रकल्पाची सखोल तपासणी करण्यात आली असून राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांनी केलेल्या शिफारशीनुसार व शासनाने प्रकल्प दोषमुक्त करताना उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुपालनाच्या पुर्ततेकरीता प्रकल्पाच्या घटक भागात झालेल्या बदलास नियामक मंडळाच्या ८३ व्या बैठकीत मान्यता प्राप्त आहे.

सदर बदलाच्या मान्यतेनुसार प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) अशी कोणतीही तक्रार क्षेत्रिय स्तरावर तसेच शासनास प्राप्त झालेली नाही त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापुर येथे उभारण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय हॉकी स्टेडीयमचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४१) * १२२७ श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या उदासीनतेमुळे कोल्हापुरात उभारण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय हॉकी स्टेडियमचे काम प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिल्या टप्प्यातील उर्वरित कामे अपूर्ण असून दुसऱ्या टप्प्यातील कामांचे प्रस्तावही अद्याप केंद्र शासनाकडे पाठविले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, कोल्हापूरच्या ३५० हून अधिक खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवर विविध स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी केली असतानाही हॉकी स्टेडियम उभारणी अपूर्णावस्थेत असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोल्हापूर महानगरपालिकेच्या उदासीन धोरणामुळे अपूर्णास्थेत असलेले हॉकी स्टेडियमच्या उभारणीचे काम पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) भारत सरकार युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाच्या 'खेलो इंडिया' या राष्ट्रीय क्रीडा विकास योजनेंतर्गत कोल्हापूर महानगरपालिकेच्या 'मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम' येथे ॲस्ट्रो टर्फ युक्त मैदान व सुविधा विकसित करणे यासाठी रुपये ५.५० कोटी रकमेच्या प्रस्तावास केंद्र शासनाची मंजूरी मिळाली आहे. त्यापैकी रुपये ३.८७ कोटी इतका निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला असून सदर निधीमधून ॲस्ट्रो टर्फयुक्त मैदान विकसित करणे, स्प्रींकलर सिस्टीम, पेव्हींग ब्लॉक इ.कामे पूर्ण झाली आहेत.

दुसऱ्या टप्प्यामध्ये मैदानावर सराव व रात्रीचे वेळेस स्पर्धा घेण्यासाठी फ्लड लाईटची सुविधा, प्रॅक्टीस ग्राऊंड विकसित करणे व अस्तित्वातील इमारतीची उर्वरित कामे करणे इ.कामे करण्यासाठी रुपये १५.९९ कोटी रकमेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सादर केला आहे.
(४) मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम उभारणीचे काम गुणवत्तापूर्ण होण्यासाठी महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रकल्प संनियंत्रण समिती (Project Monitoring Committee) गठीत करण्यात आली असून सदर समितीमार्फत प्रकल्पाच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. तसेच याकामी मागणी केलेला निधी प्राप्त झाल्यानंतर उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा कोट्यवधी रुपयांचा मालमत्ता कर नॅशनल रेयॉन कंपनीने थकविल्याबाबत

**(४२) * ६८१ अॅड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा नॅशनल रेयॉन कंपनीने रुपये १६० कोटी रुपयांचा मालमत्ता कर थकविला असूनही कंपनीस बांधकाम परवानगी देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीचा मालमत्ता कर थकीत असतानाही कंपनीस बांधकाम परवानगी कोणत्या निकषानुसार वा नियमानुसार देण्यात आली आहे व सदर परवानगी देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा मालमत्ता कर थकविला असूनही बांधकाम परवानगी देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे तसेच देण्यात आलेल्या परवानगीस स्थगिती देऊन रुपये १६० कोटी रुपयांचा मालमत्ता कर कंपनीकडून वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मे. नॅशनल रेयॉन कंपनी विरूध्द मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल याचिकेमध्ये दिनांक १३/११/२००६ रोजी “महानगरपालिकेने वेळोवेळी दाखल केलेल्या म्युनिसिपल अपीलांचा अंतिम निर्णय होईपर्यंत, महानगरपालिकेने कराच्या वसुली करू नये” असे दिलेल्या आदेशामुळे मालमत्ता कर वसूलीची कार्यवाही करता आलेली नाही.

दरम्यानच्या कालावधीत NCLT (नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल) यांनी सदर कंपनी दिवाळखोरीत निघाल्याचे आदेश पारीत केले. त्यामुळे महानगरपालिकेला थकीत रक्कम वसुलीची कार्यवाही करता येणार नसल्याने, महानगरपालिकेने NCLT (नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल) च्या आदेशाविरूध्द NCLAT (नॅशनल कंपनी लॉ ॲपीलेट ट्रिब्युनल) व मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. तेथे महानगरपालिकेची मागणी फेटाळण्यात आली.

तथापि, महानगरपालिकेने NCLAT (नॅशनल कंपनी लॉ ॲपीलेट ट्रिब्युनल) मध्ये दाखल केलेल्या अपीलावर झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विधी तज्ञांच्या अभिप्रायानुसार कंपनीकडून देय होत असलेली दिनांक १३/०३/२०२० ते मार्च २०२३ या कालावधीतील थकीत मालमत्ता कराची रक्कम वसुल करून, तद्नंतरच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमातील तरतूदीनुसार दिनांक १९/०४/२०२३ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली, ही वस्तुस्थिती आहे.

(३) मे. नॅशनल रेयॉन कंपनीकडून थकीत कराची रक्कम वसुल करण्यासाठी महानगरपालिकेने मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल केलेली असून, सद्य:स्थितीत प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या भाडेतत्वावरील प्रकल्पांतर्गतच्या घरांच्या सोडतीबाबत

**(४३) * १६७ श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) भाडेतत्वावरील प्रकल्पांतर्गत गिरणी कामगारांच्या सोडतीसाठी सन २०२० मध्ये रांजनोळीसह अन्य दोन ठिकाणची एकूण २५२१ घरे उपलब्ध झाली असतानाही अद्याप या घरांसाठी सोडत काढण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सोडत न काढण्यात आल्यामुळे गिरणी कामगार हक्काच्या घरापासून वंचित राहिलेले असून सोडत न काढण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, रांजनोळीतील घरांची दुरवस्था झालेली असून त्यांची दुरुस्ती करुन सदर घरे म्हाडाला वर्ग करण्यात यावी अशी मागणी गेल्या अनेक महिन्यांपासून गिरणी कामगार संघर्ष समितीकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सदर घरे म्हाडाच्या मुंबई मंडळाकडे वर्ग करुन सदर घरांची सोडत काढून गिरणी कामगारांना वितरीत करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) भाडेतत्वावरील प्रकल्पांतर्गत सदर २५२१ सदनिका कोविड काळात विलग्नवास सुविधेसाठी जिल्हाधिकारी, रायगड यांना तात्पुरत्या स्वरुपात हस्तांतरीत केल्या होत्या. परंतु त्या वापराच्या काळात या सदनिकांचे नुकसान झाल्याने, सदर सदनिकांच्या दुरुस्तीचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे (एमएमआरडीए) करण्यात येत आहे.

सदर सदनिकांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर सदनिकांची सोडत म्हाडा प्राधिकरणामार्फत काढण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खडकवासला आणि पवना (जि.पुणे) धरणांच्या जलाशयांच्या क्षेत्रातील जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(४४) * ४४३ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला आणि पवना (जि.पुणे) या धरणांच्या जलाशयांच्या क्षेत्रातील जलसंपदा विभागाच्या सुमारे एक हजार एकर जमिनीवर अतिक्रमण झाले असून, दोन्ही धरणांच्या अतिक्रमण केलेल्या जागांवर पाचशेहून अधिक बंगले, लॉन, रिसॉर्ट उभारण्यात आले आहेत, तसेच भराव घालून बेकायदा जमीन हस्तगत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यास्तव धरणांमधील पाणी साठविण्याची क्षमता कमी झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून याचा परिणाम पुणे जिल्ह्यातील पाणीपुरवठ्यावर होत असून याबाबत मा.जलसंपदा मंत्री यांनी कारवाई करण्याचे घोषित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने खडकवासला आणि पवना (जि.पुणे) या धरणांच्या जलाशयांच्या क्षेत्रातील जलसंपदा विभागाच्या जमिनीवर झालेले अतिक्रमण हटविण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) खडकवासला व पवना धरणाच्या जलाशयांच्या बुडीत क्षेत्रात व जलसंपदा विभागाच्या हद्दीत कोणतीही बांधकामे झालेली नाहीत.

तसेच, जलाशयांच्या प्रतिबंधीत क्षेत्रात अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांना वेळोवेळी रितसर नोटीसा देऊन व पोलीस यंत्रणेची मदत घेऊन निष्कासीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(२) पवना व खडकवासला धरणाच्या पाण्याखालील क्षेत्रात अतिक्रमण झाले नसल्याने धरणांमधील पाणी साठवण क्षमतेवर परिणाम झालेला नाही. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील पाणी पुरवठ्यावर कोणताही परिणाम झालेला नाही.

तसेच, दिनांक १७/०१/२०२५ रोजी झालेल्या कार्यशाळेत, मा.जलसंपदा मंत्री (गोदावरी व महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांनी पुणे जिल्ह्यातील धरण व कालवे तसेच पुणे शहरातील संपादित केलेल्या जमीनीवर झालेली अतिक्रमणे काढण्याबाबत आवश्यक कार्यवाही महसूल व वन विभाग, गृह विभाग व महानगरपालिका यांच्या मदतीने करावी, असे निर्देश दिले आहेत.

(३) खडकवासला आणि पवना (जि.पुणे) या धरण जलाशयाच्या बाजूने असणाऱ्या अतिक्रमण धारकांना दिनांक ३१/१२/२०२४ रोजी रितसर नोटीसा देण्यात आलेल्या असून काही अतिक्रमणे निष्कासित करण्यात आलेली आहेत. उर्वरीत अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही, जलसंपदा विभाग (स्थापत्य व यांत्रिकी विभाग), पुणे महानगरपालिका, महसूल व वन विभाग व गृह विभाग यांच्या सहकार्याने करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालाड (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गतच्या प्रकल्पाकरीता झोपडपट्टीधारकांनी बनावट वीज देयके सादर केल्याबाबत

**(४५) * ५४३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालाड (पूर्व) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/उत्तर प्रभागातील सी.टी.एस क्रमांक ८११ A/७ (pt) ते ८४४ या भुखंडावर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत मे. ओंकार रियल्टर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. आणि मे. ईरा रियल्टर्स प्रा. लि. या विकासकांनी इमारतीचे बांधकाम सुरु केले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणात झोपडपट्टीधारकांना पात्र करण्यासाठी विकासक व झोपडपट्टीधारकांनी रिलायन्स एनर्जी लि. या कंपनीची बोगस वीज देयके सादर केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुरार पोलीस ठाण्यात सदर प्रकरणी गुन्हा नोंदवून ३४३३ झोपडपट्टीधारकांच्या रहिवासी वीज देयकांची यादी सादर करण्यात आली असून त्यापैकी ८३ देयके बनावट असल्याचा अहवाल रिलायन्स एनर्जी लि. कंपनीने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अहवालाबाबत पोलीस अधिकाऱ्यांनी उप जिल्हाधिकारी, मालाड-१ व मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण यांना कळविले असता त्यांचे विकासकाशी आर्थिक हितसंबंध असल्यामुळे त्यांचेवर अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर प्रकरणी विकासकांवर आणि बनावट वीज देयके सादर करणाऱ्यांवर तसेच अहवाल देऊनही विकासकांवर कारवाई करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

जानू भोये नगर सहकारी गृहनिर्माण संस्था व इतर सहकारी संस्था या संस्थांची झो. पु. योजना दिनांक ०८/०६/२००७ रोजी स्विकृत करण्यात आली आहे. या योजनेस प्रथम आशयपत्र दिनांक ०५/०७/२००८ रोजी देण्यात आले असून तद्नंतर वेळोवेळी योजनेस सुधारित आशयपत्र देण्यात येऊन दिनांक १३/११/२०१९ रोजी अंतिम सुधारित आशयपत्र प्रदान करण्यात आले आहे. सदर आशयपत्र विकासक मे.ओमकार रियल्टर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. व सह विकासक मे. ईरा रियल्टर्स प्रा. लि. (विक्री घटक इमारतीकरीता) यांच्या नावे योजनेतील २४०० झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले असून उर्वरित झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी पुनर्वसन इमारतीचे बांधकाम सुरु आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) या प्रकरणी रिलायन्स एनर्जी लि. कंपनीने पोलीसांना दिलेल्या अहवालावरुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी दिनांक १६/०८/२०२२ व दिनांक १२/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये एकूण २२ झोपडीधारक हे बनावट कागदपत्रांच्या आधारे पात्र झाल्याचे झोपडपट्टी प्राधिकरण, बृहन्मुंबई यांना कळविले आहे.

(४) हे खरे नाही.

पोलीसांमार्फत गु.र.क्र. ७७/१५, प्रकरणी मा.न्यायालयात दाखल दोषारोप पत्रामध्ये आरोप सिध्द न झालेले आरोपी यामध्ये विकासक यांच्या नावाचा समावेश आहे. तसेच, प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुरार पोलीस ठाणे यांनी दिनांक १६/०८/२०२२ व दिनांक १२/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये एकूण २२ झोपडीधारक हे बनावट कागदपत्रांच्या आधारे पात्र झाल्याचे कळविले आहे. तसेच, मार्च- २०२४ पासून ऑनलाईन विज देयक पडताळणी प्रणाली सुरु करण्यात आली आहे. झो.पु.प्रा यांचेकडील ऑनलाईन विजदेयक पडताळणी प्रणालीमध्ये विजदेयक पडताळणी करुन एकूण २२ झोपडीधारकांची पात्रता रद्द करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयाच्या नवजात शिशु विभागातील नवजात अर्भकांचे मृत्यू रोखण्याबाबत

**(४६)** * **१७७ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) के.ई.एम. रुग्णालय, मुंबई येथील नवजात शिशु विभागामध्ये सन २०१९ ते २०२४ या सहा वर्षांच्या कालावधीत १,०९४ नवजात अर्भकांचा मृत्यू झाला असल्याची बाब दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, के.ई.एम. रुग्णालयाच्या नवजात शिशु विभागामध्ये सन २०१९ मध्ये १९९, सन २०२० मध्ये ११६, सन २०२१ मध्ये १८६, सन २०२२ मध्ये २२१, सन २०२३ मध्ये २१३ आणि सन २०२४ मध्ये १५९ नवजात अर्भकांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि के.ई.एम. रुग्णालयाच्या नवजात शिशु विभागामध्ये होत असलेले नवजात अर्भकांचे मृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना हाती घेतल्या वा घेण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

के.ई.एम.रुग्णालय, मुंबई येथील नवजात शिशु विभागामध्ये सन २०१९ मध्ये २२५, सन २०२० मध्ये २०६, सन २०२१ मध्ये १७९, सन २०२२ मध्ये १८८, सन २०२३ मध्ये १७९ व सन २०२४ मध्ये १९९ अशा एकूण १,१७६ नवजात अर्भकांचा मृत्यू झाला आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत असणाऱ्या सर्व रुग्णालयांमध्ये होणाऱ्या नवजात बालकांच्या मृत्यूबाबत रुग्णालय स्तरावर त्याची चौकशी करुन पुढील मृत्यू टाळण्यासाठी योग्य ते प्रतिबंधक उपाय योजले जातात. तसेच, गरोदर महिलांच्या सर्वंकष आरोग्याच्या दृष्टीने योग्य समयी नाव नोंदणी, औषधोपचार व आहार पुरविणे तसेच समुपदेशन केले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शामगाव (ता.कराड, जि.सातारा) या गावाचा समावेश टेंभू उपसा सिंचन योजना लाभक्षेत्रामध्ये करण्याबाबत

**(४७) * १२४५ श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शामगाव (ता.कराड, जि.सातारा) या गावाचा समावेश टेंभू उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रामध्ये समावेश करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी केली असून माहे जून, २०१९ मध्ये काढलेल्या मोर्चामध्ये आणि ग्रामस्थांनी केलेल्या उपोषणाकडे लक्ष वेधून सदर गावाचा लाभक्षेत्रामध्ये समावेश करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प सातारा जिल्ह्याच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी योगदान ठरणारा असून जिल्ह्यातील विशेषतः दुष्काळी भागातील शेतजमिनीला सिंचनाचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे तरी टेंभू उपसा सिंचन प्रकल्प मंजूर झाल्यापासून उक्त गावातील ग्रामस्थ करीत असलेली मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.

जलसंपदा विभाग, शासन पत्र क्र. संकीर्ण ०९१९/ प्र.क्र.४२४/ २०१९/ मो.प्र.१, दिनांक २४/०९/२०२४ अन्वये शामगांव, ता.कराड, जि.सातारा येथील शेतजमीन सिंचनाखाली येण्यासाठी टेंभू योजनेच्या माध्यमातून पाणी उपलब्ध होणेबाबतच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता प्रदान केली आहे.

(२) मौजे रायगांव, शामगांव, शाळगांव, पाचूंद, अपशिंगे व कोतवडे गावचे वंचित क्षेत्रास टेंभू योजनेच्या माध्यमातून पाणी उपलब्ध होण्यासाठी शासनाने अटींच्या अधीन तत्वत: मान्यता प्रदान केल्यानुसार सदर अटींच्या पूर्ततेची कार्यवाही प्रगतीत आहे. सन २०२५-२६ मध्ये उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार सर्वेक्षण व अन्वेषण करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धारावी (मुंबई) येथील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(४८) * ६५० ॲड.अनिल परब, श्री.अंबादास दानवे, श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी (मुंबई) येथील झोपडपट्टीतील रहिवाशांचे पुनर्वसन करण्यासाठी सर्व झोपड्यांचे सर्व्हेक्षण पूर्ण झालेले नसतानाही शासनाने धारावीबाहेर घरे देण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलुंड (मुंबई) येथील मिठागराची ५८.५ एकर जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी देण्यात येणार असून सदर जागेवर धारावी पुर्नविकास प्रकल्पातंर्गत धारावीतील अपात्र रहिवाशांचे धारावीबाहेर पुनर्वसन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धारावीकरांच्या पुनर्वसनास मुलुंडवासियांनी विरोध दर्शविला असून सदर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे काय, यासंदर्भात फेरविचार विनिमय होणार आहे काय,
(४) असल्यास, धारावीतील सर्व झोपड्यांचे सर्व्हेक्षण पूर्ण होण्याआधी पुनर्वसनासाठी बाहेर जागा देण्याचा प्रस्ताव योग्य नसताना सदरहू निर्णय घेतल्यामुळे नागरिकांच्या मनात घरे मिळण्याबाबत संभ्रम निर्माण झाला असून धारावी प्रकल्पाकरीता नव्याने स्विकारण्यात आलेल्या पुनर्विकास प्रकल्पातील निविदेतील बोलीपेक्षा आधीच्या निविदेतली बोली रुपये अडीच हजार कोटींनी जास्त आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबईतली शेकडो एकर जागा एकाच उद्योगपतीकडे जाणार असून सदरहू पुनर्वसन प्रकल्पासाठी शासनाने रेल्वेची ४७.५ एकर जागा विकासकास दिली आहे, हे ही खरे आहे काय, तसेच धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या प्रस्तावाचे शासन फेरअवलोकन करणार आहे काय,
(६) असल्यास, धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाची सदय:स्थिती काय आहे, पुनर्विकास कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे, धारावी झोपडपट्टी धारकांचे तात्काळ सर्व्हेक्षण करुन पुनर्विकास करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

पात्र झोपडपट्टीवासीयांचे धारावीत पुनर्वसन करण्यात येणार आहे. अपात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन दिनांक २८/०९/२०२२ च्या शासन निर्णयानुसार व गृहनिर्माण विभागाने दिनांक ०४/१०/२०२४ च्या शासन निर्णयानुसार परवडणाऱ्या भाडेतत्त्वावरील घरांच्या धोरणानुसार धारावीबाहेर करण्यात येणार आहे. आजमितीस, ८३ हजारांहून अधिक झोपड्यांवर क्रमांक टाकण्यात आले असून, त्यापैकी सुमारे ४८ टक्के झोपड्या वरच्या मजल्यावरील आहेत. अपात्र झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी सर्वेक्षण पूर्ण होणे ही निविदा अट नसून टप्प्याटप्प्याने हा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे.
(२) व (३) विद्यमान कायद्यामध्ये अपात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. परंतु धारावीमधील अपात्र झोपडीधारकांचे भाडेतत्वावरील घरांच्या योजनांतर्गत धारावी बाहेर पुनर्वसन करण्यासंदर्भात दिनांक २८/०९/२०२२ च्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे. यासाठी जमास्प सॉल्ट पॅन मुलुंड येथील ५८.५ एकर केंद्र शासनाची जमीन राज्य शासनाकडे हस्तांतरीत झाली आहे. सदर जमीनीचे मोजणीची कार्यवाही सुरु आहे.
(४) हे खरे नाही, निविदा प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने पार पडली. माननीय उच्च न्यायालयाने आधीच्या सर्वोच्च निविदाकाराचे सर्व दावे फेटाळून लावले आहेत.
(५) हे खरे नाही, विकासकाला कोणतीही जमीन दिली जात नाही. सर्व जमिनी धारावी पुनर्विकास प्रकल्प/झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे हस्तांतरित केल्या आहेत. सॉल्ट पॅनच्या जमिनी राज्य शासनाच्या ताब्यात देण्यात येणार आहेत. अशा जमिनीची किंमत विकासकाला द्यावयाची आहे. विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमन २०३४ नुसार विकासकाला पुनर्वसन घटकाच्या प्रमाणातच विकास हक्क मिळणार आहेत.

(६) धारावी पुनर्विकास प्रकल्प सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. मास्टर प्लॅन आणि बिझनेस प्लॅन अंतिम टप्प्यात आहे. जानेवारी २०२५ मध्ये रेल्वे क्वार्टर बांधकामासाठी पहिले प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात आले आहे. विकासकाला पुनर्वसन, परवडणारी घरे, सोयी-सुविधा आणि पायाभूत सुविधांचे बांधकाम ७ वर्षांच्या आत पूर्ण करायचे आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.